# जुन्नर शिवनेरी परिसर





वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन

# जुन्नर–शिवनेरी
# परिसर

# जुन्नर - शिवनेरी परिसर


लेखक

**सुरेश वसंत जाधव**

एम्.ए., पीएच्.डी., पुणे



पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभाग

महाराष्ट्र शासन

१९८२

प्रकाशक
संचालक,
पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभाग,
महाराष्ट्र शासन, मुंबई

ऐतिहासिक स्थलदर्शनमाला–४

मुद्रक
व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

मुखपृष्ठ : शिवनेरी किल्ल्यावरील जिजामाता व बाल शिवाजीची पंचधातूची मूर्ती

किंमत रु. २·७०

## दोन शब्द

श्री राजा शिवछत्रपतींचा जन्म, पुणे जिल्ह्यामध्ये पुण्याच्या उत्तरेस पसरलेल्या सह्याद्रीच्या रांगेतील ज्या किल्ल्यावर झाला, त्याचे नाव शिवनेरी. त्यामुळे या किल्ल्यास पर्यटक, इतिहासप्रेमी, यांजकडून तीर्थाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. अशा पर्यटकांसाठी, इतिहास प्रेमींसाठी, या पुस्तिकेत जुन्नर परिसरातील इतर ऐतिहासिक वास्तूंचाही समावेश केला आहे.

ही पुस्तिका लिहिण्यासाठी पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभागाचे संचालक डॉ. अ. प्र. जामखेडकर यांनी मला उद्युक्त केले त्याबद्दल त्यांचे ऋण व्यक्त करतो.

प्रस्तुत पुस्तिका लिहिताना प्रा. ग. ह. खरे, डॉ. म. के. ढवळीकर, पुणे यांच्याशी केलेल्या चर्चेचा उपयोग झाला त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे. हस्तलिखित तयार करण्याचे कामी कु. माधुरी लोमटे हिने मदत केली त्याबद्दल तिला धन्यवाद !

पर्यटकांकडून प्रस्तुत पुस्तिकेचे स्वागत होईल अशी अपेक्षा.

पुणे, ९ एप्रिल १९८२

**सुरेश वसंत जाधव.**

## निवेदन

महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभागाने महाराष्ट्रातील ऐतिहासिक व पुरातत्त्वीयदृष्ट्या महत्त्वाच्या अनेक स्थलांच्या, किल्ल्यांच्या, लेण्यांच्या पुस्तिका प्रकाशित करण्याचे ठरविले आहे. जुन्नरच्या आसमंतात जी अनेक ऐतिहासिक संस्कृतीची दालने विखुरलेली आहेत त्यात शिवरायांचा जन्म ज्या शिवनेरी किल्ल्यावर झाला त्याचा प्रामुख्याने उल्लेख करावासा वाटतो. दरवर्षी हजारो पर्यटक या किल्ल्याला भेट देतात. किल्ल्याप्रमाणेच आजूबाजूच्या महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थलांची त्यांना महती कळावी यासाठी जुन्नरच्या परिसरातील स्थळांचा समावेश या पुस्तिकेत केला आहे.

सर्वसामान्य जनतेला समजेल अशा सोप्या भाषेत पुस्तिका लिहून द्यावी अशी इच्छा मी पुण्याचे डॉ. सुरेश जाधव यांचेजवळ व्यक्त केली. त्यांनी माझ्या विनंतीला मान देऊन लेखनकार्य केले याबद्दल त्यांचा मी आभारी आहे.

या पुस्तिकेच्या कामात हातभार लावणाऱ्या कर्मचाऱ्यांचा, विशेषत: प्रकाशन सहायक श्री. चं. प्र. नांदे यांचा, तसेच अनेक शासकीय कामांचा व्याप असतानाही मुद्रणालयाच्या अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी पुस्तिकेची सुबक आवृत्ती काढल्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे.

या पुस्तिकेतील सर्व छायाचित्रे लेखकाने घेतली आहेत.

मुंबई,
शिवजयंती
२५ एप्रिल १९८२

अ. प्र. जामखेडकर

# अनुक्रमणिका

## जुन्नर परिसर : भौगोलिक

जुन्नर हे (उत्तर अक्षांश १९°-१२′ आणि पूर्व रेखांश ७३°-५३′) पुणे जिल्ह्यातील एक महत्त्वाचे तालुका केंद्र असून पुण्याच्या वायव्येस ९० किलोमीटर व सह्याद्रीच्या कडेकपारीपासून सुमारे २५ किलोमीटर अंतरावर वसलेले आहे. जुन्नर विशेषत: तीन गोष्टींसाठी प्रसिद्ध आहे. शिवरायाचा जन्म येथे जवळच शिवनेरी किल्ल्यावर झाला, तसेच ते अष्टविनायकांपैकी एक स्थान आहे; शिवाय येथे अनेक कोरीव लेणी आणि अभेद्य किल्ले आहेत. प्राचीन राजमार्ग (व्यापारी मार्ग) नाणेघाट येथून जवळच म्हणजे २७.२ किलोमीटर अंतरावर आहे. जुन्नर ते नाणेघाट हा २५ ते ३० किलोमीटरचा परिसर सृष्टिसौंदर्याने नटलेला आहे.

जुन्नर समुद्रसपाटीपासून सुमारे ७०० मीटर उंच असून कुकडीच्या खोऱ्यात वसलेले आहे. ते कुकडी नदीच्या उजव्या किनाऱ्यावर किंवा दक्षिणेस वसलेले आहे. नदीच्या आग्नेयेस रुंद पठार असून संपूर्ण गाव आठ-दहा किलोमीटरच्या परिघात अनेक टेकड्यांनी वेढलेले आहे. या टेकड्या सुमारे २०० ते ४०० मीटर उंचीच्या आहेत. नागमोडी वळणाचा मानमोडी डोंगर जुन्नरच्या दक्षिणेस तर शिवनेरी किल्ला पश्चिमेस, वायव्येस मांगणी टेकड्या, हातकेश्वर, गणेश लेणी किंवा लेण्याद्री डोंगर या रांगा जुन्नर गावाला वेढा घालतात. या टेकड्या वैशिष्ट्यपूर्ण आहेत. मानमोडी टेकडी ही सर्वांत लांब असून तीत लेण्यांचे तीन गट आहेत. मानमोडीच्या पूर्वेस (१) भीमाशंकर गट, मध्यभागी (२) अंबा-अंबिका गट आणि वायव्येस (३) भूतलेणी गट. या लेण्यांच्या पुढे मानमोडीस उथळ बशीच्या आकाराची पीरपाडा खिंड आहे. याच्या उजवीकडे शिवनेरी किल्ला व त्याचे उभे कडे आहेत. शिवनेरी किल्ल्याभोवती पूर्वेस, दक्षिणेस आणि पश्चिमेस लेण्यांचे तीन गट आहेत. शिवनेरी किल्ल्याच्या पलीकडे (पुढील कडेलोटाच्या बाजूने) वायव्येस तुळजा लेणी नावाचा छोटासा गट आहे. तुळजा टेकडीच्या उत्तरेस कुकडी नदीचे खोरे असून त्याच्या वायव्येस 'मांगणी' टेकड्याजवळ 'महार' खिंड आहे. तिच्या पश्चिमेस हातकेश्वर डोंगर आहे. त्याला लागूनच 'नवरा-नवरी' किंवा 'वरात' टेकडी व त्याच्या आग्नेयेस गणेश लेणी किंवा 'लेण्याद्री' डोंगर आहे. मुसलमानी अमदानीत यांस 'सुलेमानी' टेकड्या म्हणत. परंतु आता हे नाव प्रचारात नाही. लेण्याद्री म्हणजे

'लेण्यांचा पर्वत'. यातील एका प्राचीन काळच्या लेणीत मध्ययुगीन काळी एका लेण्याचे गणेश मंदिरात रूपांतर केले गेले. हे अष्टविनायकांपैकी एक स्थान असून दुसरे आणखी एक जुन्नरच्या जवळच उत्तरेस ओझर गावी आहे. गणेश लेणी डोंगराची रांग तशीच पुढे ईशान्येस सुमारे ३ किलोमीटर सरकत जाते नि तेथील अरुंद दरीत आणखी एक छोटासा लेणीसमूह असून हा दुरून एकदम दृष्टीपथात येत नाही. त्यामुळे क्वचितच तेथे कोणी जातो. वरील डोंगरांच्या रांगांच्या दक्षिणेस किंवा भीमाशंकर गटाच्या पूर्वेस पिरामिडच्या आकाराची 'दुधारे' नावाची लहानशी टेकडी असून या वर्तुळाकार डोंगरांच्या रांगात जुन्नर मध्यावर बसलेले आहे.

या निसर्गरम्य परिसरास कुकडी, मीना आणि पुष्पावती या तीन नद्यांनी पाणीपुरवठा होतो. कुकडीचा उगम चावंडच्या पश्चिमेस ३ किलोमीटर व नाणेघाटाच्या जवळ असलेल्या पूर या गावी आहे. समोर बाराव्या-तेराव्या शतकात यादवकाळी पूर येथे कुकडीच्या उगमावर 'कुकडेश्वर' नावाचे एक भव्य देवालय बांधले गेले असून ते प्रेक्षणीय आहे. कुकडी नदी आग्नेय दिशेने जुन्नर गावाच्या उत्तरेकडून पुढे सुमारे ३८ किलोमीटर पिंपळवडीस जाते व शेवटी शिरूरजवळ घोडनदीस मिळते. जुन्नर येथे कुकडीच्या दोन्ही तीरावर खूप मोठे खोरे असून त्यास कुकडेनेर असे म्हणतात. मीना नदी जुन्नरच्या पश्चिमेस असलेल्या ढाक या गावाच्या उतारावर उगम पावून पुढे निरगुडे, कुसुरमार्गे नारायणगावावरून पुढे पारगाव येथे घोडनदीस मिळते. मीनेच्या दोन्ही तीरावरील खोऱ्यास मिन्नेर असे म्हणतात. पुष्पावती नदी जुन्नरच्या वायव्येस माळशेज घाटानजीक उगम पावून ती मढनेर, पिंपळगाव, जोगा, उदापूर अशी साधारण कुकडीला समांतर वाहते व पुढे येडगाव येथे कुकडीस मिळते.

जुन्नरच्या परिसरात प्राचीन परंतु आजही वापरात असलेले पायऱ्यांचे जुने मार्ग दिसतात. जुन्नरच्या दक्षिणेस 'बहादूर' खिंडीतून गावात येताना खिंडीच्या जवळच जमिनीच्या सपाटीवर दगडात कोरलेले पाण्याचे एक कुंड आहे. बहादूर खिंड मानमोडी डोंगरावरील भूतलेणी गटाजवळ आहे. असेच दुसरे एक पाण्याचे कुंड जुन्नरच्या ईशान्येस बल्लावाडीपाशी खिंडीजवळ आहे. हे कुंड सातवाहन काळात येथील जी लेणी कोरली गेली त्यावेळचे असावे कारण कोरण्याची पद्धत लेण्यांतील कुंडासारखीच आहे. शिवनेरी किल्ल्याच्या दक्षिणेस कुसुर गावी जाणाऱ्या मार्गावर 'पीरपाडा' खिंड आहे. जुन्नरहून पीरपाडा खिंडीकडे व शिवनेरी किल्ल्याच्या मुख्य दरवाजापर्यंत रस्त्यात गेल्या शंभर वर्षात बरीच सुधारणा होऊन त्याचे नुकतेच डांबरीकरण केल्यामुळे किल्ल्यावर जाणारा मार्ग खूपच चांगला झाला आहे. दुसरी लहानशी खिंड शिवनेरीच्या उत्तरेपासून

निरगुडे, आपटाळा वगैरे ठिकाणी जात. जुन्नर त नाणेघाट हा प्राचीन मार्ग जुन्नरपासून पाडळी, माणिकडोह, राजूर, जलवंडी, घाटघर ते नाणेघाट असा होता. परंतु सध्या माणिकडोहावरील कुकडी नदीवर होणाऱ्या धरणामुळे हा रस्ता बंद झाला असून जुन्नरहून एस.टी. बसने आपटाळा, चावंड, घाटघर नाणेघाट असा नवीन मार्ग झाला आहे.

जुन्नर व नाणेघाट या नावांची उत्पत्ती कशी झाली हे सांगणे कठीण आहे. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात टॉलेमी या भू-शास्त्रज्ञाने 'ओमेनगर' हे मीन व शकांचे शहर 'ननगुणा' नदीच्या मुखाशी आहे असा उल्लेख केला आहे. गेल्या शतकातील एका तज्ञाने हे दाखवून दिले आहे की टॉलेमीच्या नकाशात अनेक चुका आहेत आणि त्याने नाणेघाटाचा चुकीने 'ननगुणा' असा नदीचा उल्लेख केला असावा आणि हे नाव 'नाना' आणि 'गुणा' या एकाला एक लागून असलेल्या घाटांना संबोधित असावे. तसेच जुन्नरचे प्राचीन नाव ओमेनगर असावे. परन्तु जुन्नर येथे मीन आणि शकांची वस्ती होती हे दाखविण्यास काही पुरावा नाही. सर रामकृष्ण भांडारकर यांच्या मते जुन्नर हे प्राचीन 'मीन' असावे व क्षत्रप नहपान याची राजधानी असावी. कारण जुन्नरच्या जवळच मीना नदी असून त्याच्या बाजूच्या खोऱ्यास मीन्नेर म्हणतात. हे मत तितकेसे पटत नाही. कारण जुन्नर गावाला लागूनच उत्तरेस कुकडी नदी आहे आणि दोन्ही तीराच्या खोऱ्यास कुकडनेर असे म्हणतात. जुन्नर गाव सभोवती डोंगरांनी वेढलेले आहे. शिवाय मीना नदी व मीन्नेर खोरे या डोंगराच्या पलीकडे जुन्नरच्या दक्षिणेस सुमार पाच-सहा किलोमीटर दूर आहे.

परदेशी रशियन प्रवासी अफनासीयस निकीतन हा इसवी सन १४७० च्या सुमारास जुन्नरला आला होता. तो जुन्नरचे मजेशीर वर्णन करतो. कदाचित तो दाऱ्या घाटातून आला असावा. जूनीर (जुन्नर) एका मोठ्या दगडी बेटावर वसले आहे नि येथे येण्यास एक पूर्ण दिवस लागला असे तो म्हणतो.

डॉ. जॉन फ्रायर हा इंग्रज वैद्य हिंदुस्थानात आणि पर्शियात इ.स. १६७२ ते १६८१ पर्यंत प्रवास करीत होता. तो जुन्नरला काही महिने राहिला होता. त्याने महाराष्ट्रातील काही लेणी व जुन्नरचाही वृत्तांत दिला आहे. तो जुन्नर (जिनेह) येथे भक्कम तटबंदी असलेला गड (गर) असल्याचा उल्लेख करतो. फ्रायरचा वृत्तांत तत्कालीन मुसलमानांच्या खाजगी जीवनावर महत्त्वाचा प्रकाश टाकतो.

महमंद कासीम फरिश्ता हा पर्शियन इतिहासकार विजापूर दरबारी दुसऱ्या आदिलशहाकडे १५८९ मध्ये आला होता व अखेरपर्यंत तो आदिलशहाच्या आश्रयास राहून विजापूरला १६११ साली मृत्यू पावला. फरिश्ता शिवनेरी

किल्ल्याबाबत म्हणतो की 'मालिक अहमद' याने डोंगरावर असलेल्या मजबूत शिबंदीच्या 'सुनेरे' किल्ल्यावर हल्ला केला. सुनेरे हा उल्लेख शिवनेरीचा असून ते नाव शिवाजी पूर्वी प्रचलित होते हे यावरून सिद्ध होत. फरिश्ता जुन्नरला मात्र जुनागढ असे संबोधितो.

वरील बाबतीत पुराणवस्तु संशोधनखात्याच्या इसवी सन १९०८ च्या अहवालात त्यावेळचा अधिकारी हेन्री कझिन्स याचे विवचन आहे. तो म्हणतो, जर फरिश्ताच्या वेळी जुन्नर हे 'जुनागढ' किंवा 'जुने नगर' या नावाने माहीत असले तरी त्याचे पूर्वीचे नाव काय होते ? कारण ते नेहमीच जुने नगर राहू शकत नाही. मुसलमानानी जेथे जेथे स्वाऱ्या केल्या तथे आणि विशेषत: जुन्नर जिंकून त्यास जिल्ह्याचे प्रमुख ठाणे बनविले परंतु नाव बदलले नाही हे आश्चर्य!

काही वर्षापूर्वी नारायणगाव जवळ सिंद राजा महासामंत आदित्यवर्मन् याचा (शके८८७ इसवी सन ९६५ चा) एक अपूर्ण ताम्रपट मिळाला होता. तो त्याने 'जीर्णनगर' मुक्कामी दिल्याचा उल्लेख आहे. यावरून 'जीर्णनगर' हेच आजचे जुन्नर असावे असे वाटते. काही वेळा गावात असलेल्या वास्तू किंवा सापडलेल्या वस्तू यावरूनही त्या गावाचा इतिहास थोडाबहुत समजू शकतो. तेव्हा जुन्नर येथील काही पुराणवस्तूंचा विचार करणे उपयुक्त ठरेल.

जुन्नरच्या पूर्वेस शिरोली येथे इसवी सन १८४६ साली सौराष्ट्र क्षत्रपांची ४०० नाणी सापडली. त्यावर रेव्हरंड जॉन स्टिव्हनसन याने निबंध लिहिला होता परंतु त्यातील अपूर्ण माहितीमुळे जुन्नरच्या इतिहासात फारशी भर पडू शकली नाही. १२ मार्च १९०८ रोजी जुन्नरजवळील आगर येथे अकबराची ४४ नाणी मिळाली होती. इसवी सन १९६९ साली मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील श्री. सतिश देशमुख यांना गणेश लेणीच्या पूर्वेस असलेल्या वल्लाळवाडी नजीक ईरॉस या ग्रीक देवतेचे ॲलाबॅस्टरमध्ये कोरलेले अर्धअंडाकृती शिल्प मिळाले. हे शिल्प यवनांचा म्हणजे ग्रीकांचा जुन्नर गावाशी संपर्क दर्शविते.

आणखी एक महत्त्वाचा शोध म्हणजे १९७६ साली प्रसिद्ध नाणकशास्त्रज्ञ श्री. पां. ज. चिन्मुळगुंद याना जुन्नर गावी एका शेतकऱ्याकडून एक चांदीचे नाणे मिळाले. त्यावर घोड्याचे चित्र असून ब्राह्मी लिपीत व प्राकृत भाषेत 'नायनिका' असा लेख आहे. जुन्नर जवळील नाणेघाटातील कोरीव लेखात देवी नायनिका (नागनिका) व तिचा पती श्री सातकर्णी याचा उल्लेख असून त्यांची शिल्पेही होती. तसेच तिने केलेल्या अनेक यज्ञांचा व दानांचाही उल्लेख तेथील शिलालेखात आढळतो. यावरून सातवाहन राजवंशाचा जुन्नरशी किती निकटचा संबंध होता ते स्पष्ट होते.

प्रस्तुत लेखकास १९७८ साली जुन्नरच्या लेण्यांचा अभ्यास करताना तेथील श्री. नारायण श्रीधर मते यांच्या संग्रहात एक शिशाचे नाणे मिळाले. त्यावर एका बाजूस सिंह आणि यूप (वैदिक यज्ञस्तंभ) व ब्राह्मी लिपीत 'वासिठी पुतस' असा लेख आणि दुसऱ्या बाजूस बोधिवृक्ष, धनुष्यबाण आणि ब्राह्मी लिपीत 'महाखतपस' अशी अक्षरे आहेत. याचा अर्थ नाण्याच्या एका बाजूस सातवाहन वंशातील एक राजा तर दुसऱ्या बाजूस महाक्षत्रप ही बिरुदावली. दुर्दैवाने या महाक्षत्रपाचे नाव दिलेले नाही. इसवी सनाच्या पहिल्या-दुसऱ्या शतकात क्षत्रपांचा जुन्नर, नाशिक, कार्ले या प्रदेशांशी संबंध आला होता, हे तेथील शिलालेखावरून आपणास दिसून येते. क्षत्रप व सातवाहन राजे यांचे एकमेकांशी वैर होते. परंतु वरील नाण्यात दोन्ही नावे एकत्र आलेली दिसतात. यांचा मेळ बसविणे कठीण आहे. यावर दोन शिलालेख प्रकाश पाडू शकतील. सौराष्ट्रातील गिरनार येथे महाक्षत्रप रुद्रदामन् याचा एक प्रदीर्घ शिलालेख आहे. त्यात त्याने सातवाहन राजाचा दोनदा पराभव केला व त्याचा अपरांत प्रदेश जिंकल्याचा उल्लेख आहे. परंतु त्याच्याशी रोटीबेटी संबंध जुळल्यामुळे त्याचा घेतलेला काही प्रदेश परत केला असेही तो म्हणतो. तसेच मुंबईजवळील कान्हेरी येथील एका कोरीव लेखात एक सातवाहन राणी आपण रु. . . (म्हणजे रुद्रदामन्) याची कन्या असल्याचे सांगते. या दोन्ही लेखावरून असे वाटते की, महाक्षत्रप रुद्रदामन् याने वरील घटना घडल्यानंतर व एकमेकाचे संबंध जुळल्या-नंतर त्या स्मरणार्थ हे नाणे पाडले असावे.

वरील पुराव्यांचे महत्त्व लक्षात घेऊन प्रस्तुत लेखकाने जुन्नर ते नाणेघाट हा परिसर व तेथील तीन नद्यांच्या काठावरील गावांची पाहणी केली. तेथे काही ठिकाणी सातवाहन कालीन प्राचीन वस्ती असलेली टेकाडे आढळली.

पुष्पावती नदीच्या किनारी उदापूर येथे एक टेकाड आहे. उदापूर जुन्नर-पासून १३ किलोमीटर व बल्लाळवाडीच्या ईशान्येस ७ किलोमीटर आहे. जुन्नरच्या दक्षिणेस मीना नदीच्या किनारी निरगुडे व कुसुर गावीही काही टेकाडे आहेत.

जुन्नरच्या वायव्येस माणिकडोह परिसरात काही अवशेष पूर्वी मिळाले. परंतु तो भाग आता कुकडी प्रकल्पामुळे पाण्याखाली गेला आहे. पाडळी, जुन्नर आणि आगर येथेही प्राचीन टेकाडे आहेत. पाडळी आणि आगर, जुन्नर गावात समाविष्ट झालेली आहेत.

विशेषत: कुकडीच्या किनारी जुन्नरमधील माळीवाडा आणि आगर या परिसरात प्राचीन काळच्या वस्त्यांचे भरपूर अवशेष दिसतात. केंद्र सरकार

किंवा महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाने येथे उत्खनन केल्यास जुन्नरच्या प्राचीन इतिहासावर महत्त्वाचा प्रकाश पडू शकेल. वरील विवेचनावरून जुन्नरचे प्राचीनत्व आपल्या नजरेत भरते. परंतु गेल्या शतकाच्या मध्यापासून जुन्नरचे महत्त्व बरेच कमी होऊ लागले. मुंबई-पुणे हा रेल्वे मार्ग बोरघाटातून झाल्यामुळे जुन्नर रेल्वेमार्गापासून लांब पडले. पूर्वीचा मुंबई ते नाणेघाट, जुंन्नर-पुणे हा मार्ग जवळजवळ संपुष्टात आला आणि जुन्नरचे महत्त्व बऱ्याच प्रमाणात कमी झाले.

आज जुन्नर शहर आणि त्याचा परिसर विकासाच्या मार्गावर आहे. नवीन धरणे या भागात होऊ लागली आहेत. गावाच्या पश्चिमेस जुन्या कोटाजवळ नवीन एस.टी. स्टॅण्ड झाला असून शिवनेरी किल्ल्याच्या पहिल्या दरवाजा-पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण होऊन किल्ल्यावर पायी अगर मोटारीने जाण्यास मार्ग सुलभ झाला आहे. पर्यटन केंद्रही लवकरच होण्याची शक्यता आहे.

## शिवनेरी

महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या कुशीत असलेल्या किल्ल्यांचे स्मरण झाले की, शिवाजी राजांची मूर्ती नजरेसमोर उभी राहते. त्यातील बऱ्याच किल्ल्यांशी त्यांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संबंध आलेला होता. तत्कालीन राजकीय घडामोडीत त्यांचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर झाला. त्यामुळे या किल्ल्यास महाराष्ट्राच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे. जुन्नरच्या पश्चिमेस असलेल्या नवीन एस्.टी. स्टॅण्डकडून डांबरी रस्त्याने आपण शिवनेरी किल्ल्याकडे जसे जाऊ लागतो तसतशी त्याची भव्यता आपणास जाणवते. एक भले मोठे जहाज नांगरून पडले आहे असा भास होतो. किल्ल्याच्या खाली चौरस आणि काटकोनात कोरलेली लेणी पूर्वेच्या अंगास दिसू लागतात. किल्ला सुमारे ३२५ मीटर (समुद्रसपाटीपासून सुमारे १,१०० मीटर) उंच असून दक्षिणोत्तर दीड किलो-मीटर पसरलेला आहे. दक्षिणेकडील भाग अर्धगोलाकृती तर उत्तरेकडे तो निमुळता होत गेला आहे. पूर्वेकडील वरील बाजूच्या उभ्या कपारी सुमारे १५ ते २० मीटर उंचीच्या आहेत. जेथे कडे तुटलेले आहेत तेथे तटाच्या भिंती व बुरूज बांधून संरक्षणाच्या दृष्टीने भक्कम केलेला आहे. दक्षिणेकडून नागमोडी वळणाने किल्ल्यावर आपण चढू लागतो, तेथे नैऋत्येस पहिला दरवाजा लागतो. या बाजूस कडा तुटलेला दिसतो. तेथे सुमारे ३० ते ४० मीटर लांबीची तटबंदी बुरूजासह बांधली आहे. त्याला 'जीभेचा पाडा' असे नाव आहे. किल्ल्याच्या दक्षिणेस पायथ्याशी 'भातखळे' नावाचे ओसाड गाव असून त्यात जुन्या वास्तूंचे अवशेष दिसतात. मुसलमानी अमदानीत येथे बाजार भरत असे.

पहिल्या दरवाजाने पुढे गेले असता डावीकडे मांग बुरूज लागतो. त्याची भित सुमारे २ मीटर उंचीची असून बंदुकी रोखण्यासाठी भितीत विवरे केली आहेत. यानंतर दुसरा दरवाजा लागतो. त्याला 'परवानगीचा दरवाजा' असे म्हणतात. येथेही बंदुका व तोफा ठेवण्याची जागा आहे. दरवाज्याच्या कमानीच्या दोन्ही बाजूस त्या काळातील दोन शिल्पे आहेत. त्यात वाघाच्या पायाखाली आणि मागील बाजूस हत्ती कोरलेले आहेत. यापुढे थोडा सपाटीचा रस्ता असून डावीकडे तटाच्या उंच भिती तर उजवीकडे कठडेवजा भिती आहेत. तिसऱ्या दरवाजाला 'हत्ती दरवाजा' म्हणतात. याच्या भिती सुमारे ७ मीटर उंचीच्या आहेत. पुढे 'पीराचा दरवाजा' लागतो. तो इतर दरवाजांपेक्षा मजबूत बांधणीचा आहे. तेथे जवळच एक पीर आहे. येथे जवळपास काही घरांचे अवशेष व घोड्यांचा तबेला आहे. यानंतर 'शिवाबाई' नावाचा दरवाजा लागतो. त्यावर मोठे अणकुचीदार लोखंडी खिळे ठोकलेले आहेत. येथून दोन वाटा फुटतात. पैकी डावीकडील किल्ल्याच्या माथ्यावर जाण्यासाठी व उजवीकडील 'शिवाई' मंदिराकडे जाण्यासाठी आहे. प्रथम शिवाई मंदिरास भेट देऊन नंतर किल्ल्यावरील सपाटीवर जाणे सोयीचे पडते. शिवाई मंदिर दगडी असून त्याचा चौथरा सुमारे पाच मीटर उंच, वीस मीटर लांब व आठ मीटर रुंद आहे. आतील सभामंडपात दोन रांगात प्रत्येकी पाच लाकडी खांब आहेत. गाभाऱ्यासमोर लाकडी जाळी असून देवीचा गाभारा मागील अंगास प्राचीन बौद्ध लेण्यात केला आहे. हे रूपांतर मध्ययुगीन काळाच्या अखेरीस केले गेले असावे. देवीचे मूळ स्वरूप तांदळा असे सांगितले जाते. सध्या तेथे चतुर्भुज देवीची मूर्ती आहे. मंदिरात जुन्नर गावातून पुजारी येऊन रोज पूजा-अर्चा करीत असतो. मंदिराच्या अलिकडे कातळात पाण्याची दोन प्रचंड कुंडे कोरलेली आहेत. ती उघडी असून त्यावर झाकणाची व्यवस्था नाही. बहुधा ती मराठे कालीन असावीत.

शिवाई मंदिराच्या खाली, उजव्या बाजूच्या कडेकपारीत बौद्ध लेणी आहेत. त्यांचा आपण शेवटच्या प्रकरणात विचार करू. या भागात तटाच्या भिती व बुरूज बांधलेले आहेत. शिवाबाई दरवाजाकडे परत येऊन पुढे गेले असता पाच मीटर उंचीचा 'फाटक दरवाजा' लागतो. यानंतर सुमारे पंधरा मीटरवर गडावरील सातवा किंवा शेवटचा 'कुलापकर दरवाजा' लागतो. यानंतर सपाटीचा भाग व अनेक वास्तूंचे अवशेष दिसतात. एकाला एक लागून असलेली गंगा-जमुना नावाची दोन प्रचंड पाण्याची टाकीही येथेच आहेत. ही नक्की केव्हा खोदली गेली ते सांगणे कठीण आहे. बहुतेक यादवकालीन असावीत. गडावर सुमारे तीस ते चाळीस पाण्याची कुंडे आहेत. जुन्या वास्तूंच्या अवशेषात एका

मोठ्या चौथऱ्यास ‘ सदर ’ असे नाव आहे, तर दुसऱ्याला ‘ अंबरखाना ’ किंवा ‘ हत्तीचे तबेले ’ असे आहे. उजवीकडे एका त्रिकोणात्मक टेकाडावर जिभेच्या आकाराचा खडक ‘ जिभेचा पाडा ’ नावाने ओळखला जातो. अंबरखान्याच्या नैऋत्येस मुसलमानी अमदानीतील मशीद व घुमट असलेली कबर असून मशिदीस ‘ कमानी मशीद ’ असे म्हणतात. बाजूच्या दोन मिनारावर ही कमान उभी आहे. येथील उत्तरेचा कडा देहांत शिक्षेची जागा समजली जाते. इसवी सन १७६० च्या सुमारास रामजी सावंत नावाच्या जुन्नरला असलेल्या पेशव्यांच्या प्रतिनिधीने बंडखोर जावजी कोळी व त्याच्या सात साथीदारांचा येथे कडेलोट केल्याचा उल्लेख आहे.

कमानी मशीदीच्या पूर्वेस नागमोडी पाऊलवाट आहे. तेथून गडाच्या खाली जाण्यास अरुंद पायऱ्या खोदलेल्या आहेत. त्यांना साखळदंड व कठडा असून ही वाट खाली बौद्ध लेण्यांकडून गडाच्या पायथ्याशी जाते. तिला ‘ चोर वाट ’ म्हणतात. हा गडावर येण्यास अगदी जवळचा मार्ग आहे. परंतु परतीच्या प्रवासास हा मार्ग अधिक सोयीचा आहे.

गडाच्या सपाटीवर काही वर्षांपूर्वी महाराष्ट्र शासनाने एक भव्य मंडप उभारून त्यास ‘ शिवकुंज ’ असे नाव दिले. त्याच्या मागे गाभारावजा लहानशा खोलीत सिंहासनावर विराजमान झालेल्या जिजामाता व त्यांच्या पुढे तलवार घेतलेल्या बाल शिवाजीची सुंदर पंचधातूची मूर्ती बसविलेली आहे. सर्वांना स्फूर्ती येईल अशी ही देखणी मूर्ती असून आधुनिक शिल्पकलेचा तो उत्कृष्ट नमुना आहे.

शिवकुंजाच्या उत्तरेस जुन्या वास्तूंचे अवशेष दिसतात. येथे किल्ल्यावरील सरदारांची निवासस्थाने असण्याची शक्यता आहे. या अवशेषाच्या पुढील बाजूस एक दुमजली इमारत आहे. अरुंद जिन्याने वर गेले असता मुसलमानी पद्धतीच्या कमानी असलेल्या काही खोल्या आहेत. येथून जुन्नर शहराचे विहंगम दृश्य दिसते. याच वास्तूत हिंदवी स्वराज्य स्थापन करणाऱ्या शिवरायांचा जन्म झाला. ही वास्तू अनेक वर्षे पडक्या अवस्थेत होती. तिचा जीर्णोद्धार १९२५ साली करवीर छत्रपती व श्री भास्करपंत जाधव यांच्या प्रयत्नाने झाला.

शिवजन्मस्थानाच्या पुढे गड निमुळता होत जातो व उत्तरेकडील निमुळत्या टोकास ‘ कडेलोट ’ असे नाव आहे. तेथे वाऱ्याचा प्रचंड झोत असतो. परंतु तेथून पश्चिम ते पूर्व अशा वीस पंचवीस किलोमीटर प्रदेशाचे विहंगम दृश्य दिसते.

V. P. Bhagwat

## शिवनेरी–जुन्नर ऐतिहासिक घटना

शिवनेरी किल्ला नक्की कोणी बांधला हे सांगणे कठीण आहे. राष्ट्रकूट राजवटीच्या अखेरीस किंवा यादव कालात हा किल्ला बांधला असण्याची जास्त शक्यता वाटते. अर्थात गडावरील तटबंदी, बुरूज इत्यादी बांधकाम वेगवेगळ्या काळात बांधले गेले इसवी सन १४४३ मध्ये हा किल्ला मलिक-उल-तुजार या बहामनी सरदाराने यादवांच्याकडून जिंकून घेतला व जुन्नरहून मोठे सैन्य घेऊन तो कोकणात स्वारीवर निघाला. याच काळात बहामनी सत्तेने कोळी समाजातील एकास सरनाईक नेमून या प्रदेशात असलेले बंडखोर कोळी व मावळे यांचा बंदोबस्त केला.

इसवी सन १४७० च्या सुमारास रशियन प्रवासी अफनासियस निकितीन मुंबईच्या दक्षिणेस असलेल्या चौल बंदरातून दाऱ्या घाट मार्गे जुन्नरला आला होता. त्याने या परिसराचे व राजकारणाचे त्रोटक वर्णन दिले आहे. तो पावसाळ्याचे सुमारास आला असावा; कारण त्याने येथे सतत चार महिने पाऊस व चिखल झाल्याची नोंद केली आहे.

इसवी सन १४८५ मध्ये मलिक-उल-तुजारचा प्रतिनिधी मलिक महमद याने शिवनरी किल्ल्यावर हल्ला केला. किल्लेदाराने विरोध केला. परंतु मलिक अहमदपुढे त्याचा टिकाव लागला नाही. त्याने किल्ला जिंकून अफाट संपत्ती हस्तगत केली व आपले अधिकारी व शिपायांना भरपूर बक्षिसे देऊन पुण्याच्या पश्चिम व नैऋत्य प्रदेशावर वचक बसविला. जुन्नर हे जिल्ह्याचे व कारभाराचे मुख्य ठिकाण केले. इसवी सन १४८६ मध्ये मलिक अहमद जंजिऱ्याजवळील राजापुरीवर हल्ला करीत असताना त्याच्या वडिलांचा खून झाल्याची खबर लागून तो लगेच जुन्नरला परतला. त्याने 'निझाम-उल-मुल्क बहिरी' हा किताब धारण करून जुन्नर परिसराचा विकास सुरू केला. यानेच अहमदनगरची निजामशाही स्थापन केली. या सुमारास महमद शाह बहामनी दुसरा (१४८२–१५१८) याने विजापूरचा युसुफ आदिलखान यास व चाकणच्या सुभेदारास मलिक अहमदवर हल्ला करण्यास पाठविले. मलिक अहमदने चाकणच्या सुभेदारास आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न केला; परंतु तो फसला. बहामनी सैन्य त्याच्याविरुद्ध चाल करून आले. मलिक अहमदने आपले कुटुंब शिवनेरीवर ठेवून शत्रूवर प्रतिहल्ला केला. त्याने चाकण जिंकले व बहामनी सैन्याचा पराभव करून तो जुन्नरला परत आला. इसवी सन १४९३ मध्ये त्याची बहीण, ही दौलताबाद किल्ल्याच्या सुभेदाराची पत्नी होती, भावाकडे आपल्या नवऱ्याचा व मुलाचा खून झाल्याची तक्रार घेऊन आली. मलिक अहमदने दौलताबादवर स्वारी केली. तो दोन महिने लढला. परंतु किल्ला घेता न आल्यामुळे जुन्नरला परत आला.

इसवी सन १४९४ ला त्याने आपली राजधानी जुन्नरहून हलवून नवीन वसवलेल्या अहमदनगर येथे नेली.

इसवी सन १५९५ मध्ये बहादूर निझामशाह दुसरा (१५९५–१६०५) याने शिवाजी राजांचे आजोबा मालोजी भोसले यांना पुणे, सुपा, चाकण व शिवनेरीची जहागिरी देऊन राजे हा किताब दिला. इसवी सन १६३० च्या सुमारास आदिलशाही शासनात विजयराव सिधोजी विश्वासराव शिवनेरी किल्ल्याचे किल्लेदार होते. हे शहाजी व जिजाबाई यांचा प्रथम पुत्र संभाजीराव भोसले यांचे सासरे होत. या राजकीय धामधुमीच्या काळात शहाजीने गर्भवती जिजाबाईस आपले व्याही विश्वासराव यांच्याकडे ठेवले. शिवनेरी गडावरील शिवाई देवीस जिजाबाईने नवस केला की, " हे माते, मला पराक्रमी योद्धा असा पुत्र होऊ दे त्याचे नाव मी तुझ्यावरून शिवा असे ठेवीन." कागदोपत्री जरी जिजाबाई काय म्हणाल्या यास पुरावा नसला तरी पुढे शिवाई देवीवरून पुत्राचे नाव शिवा–शिवबा–शिवाजी असे ठेवले गेले. यावरून वरील विधानास पुष्टी मिळते. यथावकाश फाल्गुन वद्य तृतिया, शके १५५१ (१९ फेब्रुवारी १६३०) रोजी जिजाबाई प्रसूत झाल्या व शिवाईच्या कृपेने पुत्रप्राप्ती झाली. त्याचे नाव शिवाजी असे ठेवले. शिवाजी राजांचे बालपण शिवनेरी किंवा पुणे परिसरात कसे गेले यास कागदोपत्री पुरावा नाही परंतु दादाजी कोंडदेव यांनी बाल शिवाजीस पराक्रमी योद्धा बनविण्याचे धडे दिले हे सर्वश्रुत आहे.

इसवी सन १६५० च्या दरम्यान पुणे-जुन्नर परिसरात कोळ्यांनी बंड केले. मोंगलांनी आपले सैन्य पाठवून त्यांचे बंड मोडले. बऱ्याच कोळ्यांना पकडून जुन्नरला आणले व त्यांचा शिरच्छेद शिवनेरीवर केला. या जागेस जुन्नरमध्ये 'काळा चबुतरा' असे म्हटले जाते.

इसवी सन १६५७ मध्ये शिवाजीने जुन्नरवर हल्ला करून ३,००,००० सोन्याच्या मोहरा, २०० घोडे, उंची कपडे आणि इतर मौल्यवान वस्तू लुटल्या. परंतु त्याला जुन्नर व शिवनेरी पूर्णपणे जिंकता आले नाही. इसवी सन १६७० मध्ये जुन्नर व शिवनेरीवर त्याने हल्ला केला परंतु तोही अयशस्वी ठरला. पुन्हा एकदा शिवाजीने इसवी सन १६७५ मध्ये आपला जन्म झालेल्या शिवनेरीवर स्वारी केली तीही अयशस्वी ठरली. दुर्दैवाने शिवाजी महाराजांना आपले जन्मस्थान जिंकणे शेवटपर्यंत शक्य झाले नाही.

मागे सांगितल्याप्रमाणे इसवी सन १६७३ च्या सुमारास डॉ. जॉन फ्रायर हा इंग्रज वैद्य कित्येक दिवस जुन्नर मुक्कामी होता. तो वैद्यकीय पेशातील

असल्यामुळे त्याने मुसलमान बेगमांचे आजार, त्यावर त्याने केलेले उपचार शिवनेरी किल्ला, गणेश लेणी परिसर वगैरेसंबंधी मजेशीर आठवणी लिहून ठेवल्या आहेत. त्या तत्कालीन सामाजिक परिस्थितीवर प्रकाश पाडतात.

इसवी सन १७९० च्या कागदोपत्री जुन्नरमध्ये एकूण महसूल रु. १४,६४,३३८ असल्याची नोंद आहे. जुन्नर प्रांत (परगणा) अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर-पासून ते पुणे जिल्ह्यातील सासवडपर्यंत होता. यावरून आपणास त्याकाळी जुन्नर शहर किती भरभराटीस आलेले होते याची कल्पना करता येते.

नाना फडणविसाने इसवी सन १७९३ मध्ये रघुनाथरावांची दोन मुले, बाजीराव आणि चिमाजी आप्पा, यांना जुन्नरच्या गढीत कैद करून ठेवले होते. सवाई माधवरावांचा मृत्यू इसवी सन १७९५ मध्ये झाला त्यावेळी परशुरामभाऊने बाजीरावास जुन्नरहून सोडवून त्यास पुण्यास पेशवेपद दिले.

तत्कालीन मुंबईचा गव्हर्नर लॉर्ड एलफिन्स्टन याने जुन्नर लेण्यांना इसवी सन १८१४ च्या जून महिन्यात भेट दिली. याच सुमारास इंग्रजांनी महाराष्ट्रातील बराचसा भाग काबीज केला होता. या धामधुमीत बाजीराव पेशवा सातार्‍यातील माहुलीहून जुन्नरला त्र्यंबकजी डेंगळे याच्या आश्रयास आला. परत तिथे सुरक्षितता न वाटल्यामुळे बाजीराव पुण्याच्या दक्षिणेस पळाला. नंतर पेशव्यांच्याबरोबर झालेल्या युद्धात २० मे १८१८ रोजी मेजर एल्ड्रीज आपली फौज घेऊन जुन्नरला आला. जुन्नरची गढी व शिवनेरी किल्ला दुसर्‍याच रात्री त्याने जिंकला.

शिवनेरीचा किल्लेदार (सुभदार ? ) जुन्नरच्या पश्चिमेस असलेल्या हडसर किल्ल्यावर पळाला, परंतु त्यास तेथे पकडण्यात आले. त्यानंतर इंग्रजांनी आपली बॉम्बे नेटिव्ह इन्फन्ट्रीची बटालियन जुन्नरला ठेवली.

इसवी सन १८२७ च्या कागदोपत्री जुन्नर हे तालुक्याचे ठिकाण व तेथे ३,००० घरे असल्याची नोंद आहे. इसवी सन १८२८ साली जुन्नरमध्ये काही फळबागा, स्थानिक बाजार आणि लोकसंख्या ८,००० च्या आसपास असल्याची नोंद आहे. डॉ. गिब्सन या इंग्रज वनअधिकार्‍याने इसवी सन १८४१ मध्ये चार चिनी कैद्यांच्या साह्याने शिवनेरी किल्ल्यावर झाडे लावली. शिवनेरी किल्ल्यावर आरोग्यधाम करण्याची त्याची कल्पना होती. कारण त्याच सुमारास माळसेज घाटातून 'मध्य सह्याद्री रेल्वे' नेण्याचे प्रयत्न चालू होते. झाडे लावली गेली; परंतु पुढे रेल्वे लाईन टाकण्याचे रद्द झाले.

यानंतर गेल्या शंभर वर्षात जुन्नर-शिवनेरीच्या इतिहासात नोंद करण्या-सारख्या घटना घडल्या नाहीत. परंतु स्वातंत्र्यानंतर आणि विशेषतः संयुक्त

महाराष्ट्र स्थापनेच्या वेळी म्हणजे २७ एप्रिल १९६० रोजी शिवजन्मतिथीचा मुहूर्त साधून महाराष्ट्र राज्याची घोषणा व अमृतकलशाची स्थापना जुन्नर येथे शिवनेरी किल्ल्यावर झाली.

**जुन्नर गावातील वास्तू**

(१) **कोट**--जुन्नर गावात अनेक वास्तू आहेत, परंतु त्यातील बऱ्याच अर्वाचीन कालातील आहेत. यांत कोट ही सर्वात महत्त्वाची वास्तू आहे. जुन्नर गावाच्या आग्नेयेस मामलेदार कचेरी, कोर्ट आणि इतर सरकारी कार्यालये या कोट किंवा जुना सय्यद वाडा या भुईकोट किंवा किल्लेवजा गढीत आहेत. या कोटाची लांबी-रुंदी सुमारे ३०० मीटर × २०० मीटर अशी आहे. त्याच्या भिंती काही ठिकाणी पाच मीटर तर काही ठिकाणी सात मीटरपर्यंत उंच असून त्याच्या सभोवती एकूण १४ बुरूज होते. त्याच्या भिंतीचा चौथरा दगडी व वरील बांधकाम मातीत केलेले आहे. बुरुजाच्या भिंती कच्च्या व पक्क्या विटांत बांधलेल्या असून मुख्य प्रवेशद्वार पूर्वेस आहे.

मुसलमानी अमदानीत यात शाही हमामखाने, इमारती व छोटीशी मशीद होती. याच गढीत शेवटचा बाजीराव यास नजरकैदेत ठेवले होते. त्या काळातील हा कोट हीच जुन्नर गावाची संरक्षणात्मक इमारत म्हणता येईल.

(२) **जुना बैटकला**-- वरील गढीच्या आग्नेयेस पाऊण किलोमीटर अंतरावर सुमारे ६०० मीटर × ६०० मीटरच्या सपाटीवर ही इमारत आहे. यास बारा दरवाजे होते. आता फक्त त्यांचे अवशेष दिसतात. जुन्नर गावात आधुनिक लहान मोठी पन्नास-साठ मंदिरे आहेत. त्यात दोन जैनांची व बाकीची हिंदूंची आहेत.

(३) **पंचलिंग**---हे मंदिर गावाच्या पश्चिमेस सुमारे एक किलोमीटर दूर असून शिवनेरी किल्ल्याकडे जाताना लागते. इसवी सन १८०० च्या सुमारास हे मंदिर बांधले गेले. मंदिरास सभामंडप असून गर्भगृहात लिंगाची स्थापना केली आहे. घुमटावर वाघ, सिंह आणि हिंदू दैवतांची शिल्पे आहेत. मंदिरास लागून एक लहानसे विश्रामगृह व विहीर आहे.

(४) **गणपती**---रविवार पेठेतील हे गणपतीचे मंदिर इसवी सन १८२० च्या सुमारास बांधले गेले. यात मुंज, लग्न व इतर धार्मिक विधी आजही होतात.

(५) **उत्तरेश्वर**---गावाच्या पूर्वेस साधारण एक किलोमीटर अंतरावर कुकडी नदीच्या काठी हे शिवालय असून मंदिरास चढून जाण्यास पायऱ्या आहेत.

(६) **पाताळेश्वर**--कुकडी नदीच्या डाव्या तीरावर, गावापासून उत्तरेस सुमारे सव्वा किलोमीटर अंतरावर, हे शिवालय आहे. याचा गाभारा जमिनी-खाली आहे.

(७) **ठाकुरद्वार**--कृष्णाचे हे लहानसे मंदिर कुकडी नदीच्या किनारी गावाच्या उत्तरेस सुमारे पाऊण किलोमीटर अंतरावर आहे.

(८) **पार्श्वनाथ**--गावातील दोन जैन मंदिरांपैकी एक बुधवार पेठेत व दुसरे फणसु भवार्डमध्ये आहे. पहिले मंदिर पार्श्वनाथ या जैन तीर्थकाराचे असून ते चांगले आहे. गावातील गुजराती व्यापारी बंधूंनी गेल्या शतकात हे मंदिर ३०,००० रु. खर्च करून वांधले. याची देखभाल ट्रस्ट करीत असतो. तीन मजली वाड्यात हे मंदिर उभारले आहे. पहिल्या मजल्यावर जैनांच्या धार्मिक बैठकी होतात. दुसऱ्या मजल्यावर पुढील भागात सभामंडप, बाजूला दोन दालने व मागील भिंतीत गाभारा आहे. गाभाऱ्यात श्री पार्श्वनाथाची नग्न मूर्ती आहे. मंदिरात संगमरवरी फरशी असून भिंतीवर जैन देवतांची काचा लावलेली चित्रे आहेत. छतावर सागवानी लाकडाचे कोरीव काम असून गाभाऱ्याच्या दरवाजास चांदीच्या पत्र्याने मढविले आहे. तिसाऱ्या मजल्यावर सामान: ठेवण्याची खोली व प्रांगणात विहीर नि आंघोळीची सोय केलेली आहे.

(९) **जुम्मा मशीद**--गावात मुसलमानी अमदानीतील अनेक कबरी व काही मशिदी आहेत. त्यांत महत्त्वाची जुम्मा मशीद असून ती गावाच्या साधारण मध्यभागी किंवा कोटाच्या पूर्वेस आहे. मशिदीचे आतील मोजमाप सुमारे २२ मीटर १४ मीटर असून तीन रांगात प्रत्येकी सहा दगडाचे खांब आहेत. खांबांच्या कलाकुसरीवरून ती हिंदू कारागिरांनी घडविल्याचे दिसते. प्रवेश-द्वारावरील शिलालेखात हिजरी १२३५ (इ. स. १८१८) ही तारीख आहे.

(१०) **रोशन मशीद**--लाल दरवाजाजवळ रोशन नशीद असून तिच्या पूर्वेकडील कमानीतून प्रवेश करावा लागतो. आत तीन घुमट असून ते दोन अष्टकोनी खांबांवर आधारित आहेत. रोशन मशीदीच्या पूर्वेस मोकरबा नावाची एक घुमटवजा कबर आहे.

(११) **सौदागर गुंबझ**--वरील मशीदींच्या पूर्वेस समारे दीड किलो-मीटर अंतरावर मुसलमानी अमदानीतील वैभवाची साक्ष देणारी इमारत आहे.

(१२) **हफीज बाग**--सौदागर गुंबझच्या पूर्वेस दीड किलोमीटर अंतरावर हफीज बाग असून तेथे पाण्याचा भरपूर साठा आहे. मुसलमानी अमदानीतील वैभवशाली इमारतीनी एकेकाळी हा गजबजलेला भाग होता.

हाफीज हे हबशी किंवा अबिसिनीयन या शब्दांचा अपभ्रंश असावा. येथे दोन इमारती असून त्यावरील कलाकुसर मुसलमानी धर्तीची आहे. एका इमारतीच्या आत नऊ कबरी आहेत. या कबरींबाबत असे सांगितले जाते की, यांतील एक हबशी प्रमुखाची, दुसरी त्याची पत्नी, सहा मुले व एक नोकर अशा नऊ जणांचे येथे दफन केले गेले.

**चावंड किल्ला**

जुन्नरच्या वायव्येस १६ कि. मी. आणि नाणेघाटपासून साधारण तितक्याच अंतरावर जीर्ण व खूप पडझड झालेल्या अवस्थेत चावंड किल्ला आहे. नाणेघाट खोऱ्यांतील इतर हडसर, जीवधन वगैरे किल्ल्याप्रमाणेच चावंडही व्यापारी मार्गावरील संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे होता. हे सर्व किल्ले नाणेघाटची संरक्षक भिंतच होती. चावंड किल्ल्याभोवती उभे कडे आहेत. किल्ल्याच्या शिखरावर काही ठिकाणी दोराच्या सहाय्याशिवाय चढणे अत्यंत कठीण आहे. शिखराच्या सपाटीवर चावंडबाईचे जीर्ण अवस्थेतील लहानसे देवालय आहे. किल्ल्यावर पाण्याची सोय आहे.

इसवी सन १४८६ च्या सुमारास पुणे परिसरातील किल्ल्यात चावंडचा समावेश होत होता. पुढे तो अहमदनगरची निझामशाही स्थापन करणाऱ्या मलिक अहमदच्या ताब्यात गेला. इसवी सन १५९४ मध्ये बुऱ्हान निझाम (दुसरा) याच्या बहादूर नावाच्या मुलास चावंड किल्ल्यावर सुमारे वर्षभर कैदेत ठेवले होते. नंतर त्यास अहमदनगरच्या गादीवर बसवले. शहाजी राजाच्या जहागिरीत पुणे परिसरातील अनेक किल्ले होते. त्यात चावंडचा समावेश होता. तो त्याने इसवी सन १६३७ साली मोगलांच्या ताब्यात दिला. १८१८ साली इंग्रज व मराठे यांच्यात तुंबळ युद्ध झाले. त्यावेळी इंग्रजांनी चावंडला भली मोठी फौज आणून किल्ल्याच्या सुभेदारास शरण येण्यास सांगितले; ते त्याने नाकारले. इंग्रज फौजांनी संपूर्ण रात्रभर आणि दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत तोफांचा भडिमार करून किल्ला हस्तगत केला. दीडशेच्या वर मराठा सैन्य शरण आले. त्यांची शस्त्रे हस्तगत करण्यात येऊन त्यांना पिटाळण्यात आले. तोफांच्या भडिमारात किल्ल्याचा खूपच विध्वंस झाला नि आज तो जीर्ण अवस्थेत आहे.

**हडसर किल्ला**

हा किल्ला नाणेघाटाच्या खोऱ्यात जुन्नर गावापासून वायव्येस सुमारे १२ कि. मी. अंतरावर असून पायथ्याशी हडसर खेडे आहे. किल्ल्याची उंची जुन्नर सपाटीपासून सुमारे ३०० मीटर असून नैसर्गिक उभ्या कड्याची

तटबंदी साधारण पन्नास ते साठ मीटर उंच आहे. किल्ल्याचा आकार त्रिकोणी आहे. वर जाण्यास नेहमीप्रमाणे दरवाजे असून कडे तोडून रस्ता केलेला आहे. किल्ल्यावर पडझड झालेल्या अवस्थेत किल्लेदाराच्या कचेरीचे व एका लहानशा मंदिराचे अवशेष आहेत. त्याच्या पश्चिमेस खोदलेल्या मार्गाने गेल्यास तीन तळघरवजा खोल्या लागतात व त्या धान्याची कोठारे असण्याची शक्यता आहे. सध्या ती पाण्याने भरलेली असतात. किल्ल्यावर पाण्याची अनेक टाकी आहेत.

शहाजी राजांनी इसवी सन १६३७ मध्ये आपले पाच किल्ले मोगलांना दिले; त्यात हडसरचा समावेश आहे. इसवी सन १८१८ मध्ये इंग्रजांनी जुन्नर शहर काबीज केले त्यावेळी जुन्नरचा किल्लेदार हडसर किल्ल्यावर संरक्षणार्थ पळाला. परंतु इंग्रजांनी त्यास किल्ल्यावर पकडून त्याच्या मामुली सैन्याचा सहजतेने पराभव केला.

**जीवधन किल्ला**

जुन्नरच्या वायव्येस २५ कि. मी. व नाणेघाटाजवळील घाटघर गावाच्या हद्दीवर जीवधन किल्ला वसलेला असून समुद्रसपाटीपासून त्याची उंची सुमारे १,००० मीटर आहे.

गेल्या शतकातील 'बाम्बे कूरियर' या वर्तमानपत्राच्या १६ मे १८१८ च्या अंकात इंग्रजांच्या पलटणीतील अधिकारी मेजर एल्ड्रीज याने या किल्ल्याचे खास वर्णन केले आहे. तो म्हणतो "हा किल्ला शत्रूंच्या तोफखान्यापुढे अत्यंत अभेद्य आहे आणि त्यामुळे आतील सैन्य सुरक्षित राहून लपू शकते. किल्ल्याच्यावरती दीड फूट उंचीच्या २४० पायऱ्या दगडात कोरल्या असून त्या शिडीसारख्या असल्याने चढण्यास अत्यंत कठीण आहेत. किल्ल्याच्या मध्यास वायव्येस १०० यार्डाची सपाटी असून याच्या पुढे डोंगराच्या कडा आहेत. या कडांच्या किनाऱ्यावरून पुढे परंतु किल्ल्यापासून अलग झालेला नैसर्गिक कडा सुमारे ३०० फूट उंचीचा निमुळता असून समोर भयंकर खोल दरी दिसते. किल्ल्याच्या नैऋत्येच्या कड्यावरून जर दगड खाली टाकला तर खाली तळकोकणात तो २,००० फूटावर जाऊन पडेल." वरील उताऱ्यात अतिशयोक्ती नसून सत्यता आहे.

किल्ल्याची लांबी सुमारे १,००० मीटर, रुंदी ५०० मीटर व परीघ सुमारे ३ किलोमीटर आहे. नाणे-गुणाघाटाच्या खाली तळकोकणातून या किल्ल्याकडे पाहिले असता सुमारे ७०० मीटर उंचीची सह्याद्री कड्याची भिंत याच्या पश्चिमेस दिसते. त्यामुळे या बाजूने तो संरक्षणास अत्यंत मजबूत आहे. घाटघरच्या बाजूने किल्ल्यावर जाण्यास दीड किलोमीटर अवघड रस्ता आहे.

घडीव पायऱ्या निखळून गेल्या आहेत त्यामुळे कडेकपारांतून जावे लागते. किल्ल्याच्या पश्चिमेकडे नाणेघाटाच्या बाजून वरती जाण्यास दरवाजा होता. परंतु त्या बाजूची वाट आता खूपच पडकी झालेली आहे. तेथे बांधीव घडणीच्या दगडात कोरलेल्या पायऱ्यांचे अवशेष दिसतात. किल्ल्यावर एक चौकोनी विहीर व आजूबाजूस पाण्याच्या पाच-सहा टाक्या आहेत आणि जुन्नरसारखी काही लेणी आहेत. त्यांत कलाकुसर काहीच नाही. एक लेणे सुमारे ९ मी.× ७ मी.×५ मी. चे आहे. कदाचित ती बुद्धधर्मीय लेणी असू शकतील. या लेण्यांच्या समोर व परिसरात मुसलमानी अमदानीतील बांधकामाचे अवशेष दिसतात. जीवधन किल्ल्यावरून पश्चिमेच्या बाजूने तळकोकणचे विहंगम दृश्य दिसते.

जीवधन किल्ल्याचा इतिहास अत्यंत त्रोटक आहे. वरील किल्ल्याप्रमाणेच त्याचीही स्थिती होती. अहमदनगरची निझामशाही स्थापन करणारा मलिक अहमद याने तो ताब्यात घेतला व तो निझामशाहीकडे इसवी सन १४९० ते १६३६ पर्यंत होता. इसवी सन १६३७ मध्ये शहाजीने पुणे परिसरातील आपल्या पाच किल्ल्यांपैकी हाही मोगलांच्या ताब्यात दिला. वरील किल्ल्यांप्रमाणेच, इंग्रज-मराठे युद्धात ३ मे १८१८ रोजी मेजर एल्ड्रीज याने तोफांच्या माऱ्याने किल्ल्याच्या भिंती, दरवाजे, वाटा उध्वस्त केल्या व मराठ्यांचा पराभव करून किल्ला ताब्यात घेतला. आज तो जीर्ण अवस्थेत आहे.

### जुन्नर लेणी

आतापर्यंत आपण जुन्नर व परिसरातील सृष्टिसौंदर्य, किल्ले नि इतर वास्तूंचे स्थलवर्णन व थोडक्यात त्यांचा ऐतिहासिक परामर्ष घेतला. या प्रकरणात आपण जुन्नरच्या आजूबाजूच्या डोंगरातील लेण्यांचा परिचय करून घ्यायचा आहे. अनेकजण लेण्यांच्या अभ्यासाबाबत अनभिज्ञ असतात. अनेक वेळा लेण्यांचा संदर्भ महाभारतातील पांडवांशी लावतात. वनवासात पांडव महाराष्ट्रात आले आणि त्यांनी लेणी कोरली अशी दंतकथा सर्वसाधारणपणे सर्व लेण्यांबाबत सांगितली जाते. नाशिक जवळील पांडव लेणी म्हणून प्रसिद्ध असलेली तसेच इतर ठिकाणी पांडवदरा वगैरे नावांनी माहीत असलेली लेणी वरील संदर्भाची प्रचिती देतात. तसेच काहीजण लेण्यांचा संबंध आकाशातील किन्नर, गंधर्व वगैरेशी जोडतात. किन्नर, गंधर्व मध्यरात्री आले; त्यांनी लेणी नखांनी कोरण्यास सुरुवात केली; पहाटे कोंबडा आरवला, ते उडून गेले; वेळेअभावी कोरणे अपुरे राहीले. अशाप्रकारे अपूर्ण राहिलेल्या लेण्यांचे स्पष्टीकरण दिले जाते.

V.P. Bhagwat

महाराष्ट्र जसा किल्ल्यांकरिता प्रसिद्ध आहे तसाच कोरीव लेण्यांसाठीही प्रसिद्ध आहे. भारतातील १,२०० लेण्यांपैकी सुमारे १,००० लेणी महाराष्ट्रात आहेत. संख्येच्या दृष्टीकोनातून विचार केला असता जुन्नरमध्ये सर्वात जास्त लेणी कोरली गेली हे बऱ्याच लोकांना अज्ञात आहे. अर्थात जुन्नरची लेणी कलाकुसर व शिल्पांबाबत नाशिक, कार्ले, पितळखोरे, अजंठा, वेरूळ वगैरेंच्या तुलनेत बरीच मागे पडतील. परंतु जुन्नरच्या लेण्यांची विविधता व जी थोडीशीच कलाकुसर व शिल्पे आहेत ती निश्चितच सरस आहेत.

प्रथम लेणी कोरण्याचा इतिहास जाणून घेणे आवश्यक आहे. भारतात प्रथम मौर्यवंशातील सम्राट अशोक व त्याचा नातू दशरथ याने आजीविक पंथासाठी अल्पशा प्रमाणात बिहार प्रांतात गयेजवळील बाराबर व नागार्जुनी टेकड्यांवर इसवी सनापूर्वी तिसऱ्या आणि दुसऱ्या शतकात लेणी कोरली. त्या लेण्यांतील शिलालेखावरून त्यांचा काळ ठरविता आला. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले तर येथे प्रथम सातवाहन राजाच्या कारकीर्दीत लेणी कोरण्यास सुरुवात झाली. संपूर्ण सातवाहन राजवंशाचा एकूण काळ किती हे सांगणे कठीण आहे. अनेक पुराणांत एकूण सातवाहन राजे व त्यांचा एकूण काळ यात एकवाक्यता नाही. सर्वसाधारण तीस राजे मानले जातात व त्यांचा एकूण काळ ३०० ते ४६४½ वर्षे सांगितला जातो. काही तज्ज्ञांच्या मते सातवाहन राजवंशाची सुरुवात मौर्य कालाअखेर म्हणजे इसवी सन पूर्व दुसऱ्या शतकाच्या सुरुवातीस किंवा इसवी सन पूर्व पहिल्या शतकाच्या सुरुवातीस झाली. त्याचा अस्त इसवी सन २३० च्या सुमारास झाल्याबद्दल सर्वसाधारण एकमत आहे. या कालखंडात महाराष्ट्रातील बौद्धधर्मीय लेणी कोरली गेली. बौद्धधर्मात मुख्यतः दोन पंथ आहेत. त्यातील पहिला वरील कालखंडातील हीनयान पंथीय व दुसरा महाराष्ट्रात इसवी सनाच्या पाचव्या शतकाच्या मध्यास सुरुवात झालेला महायान पंथ. दुसरा कालखंड इसवी सनाच्या सातव्या किंवा आठव्या शतकाच्या अखेरीपर्यंत जातो. या कालखंडात फक्त इसवी सनाच्या तिसऱ्या आणि चौथ्या शतकात लेणी कोरण्याची कला जवळजवळ अस्तगत झाली होती.

महाराष्ट्रात फक्त बौद्धधर्मीयांनीच लेणी कोरली नाहीत. कदाचित त्यांच्यापासून प्रेरणा मिळून इसवी सनाच्या सहाव्या शतकाच्या मध्यापासून ते नवव्या शतकाच्या अखेरीपर्यंत हिंदू व जैन धर्मीयांनीही लेणी कोरली. सातवाहनांच्या नंतर महाराष्ट्रात आभीर, त्रैकूटक, वाकाटक, कलचुरि, चालुक्य व राष्ट्रकूट राजवंश होऊन गेले. या सर्व राजवटीत फारच थोड्या लेण्यांना विशिष्ट राजांनी दान दिल्याचे दिसते; तर बहुतेक लेणी लोकांच्या

देणग्यांतून कोरली गेल्याचे शिलालेखावरून आपणास समजते. ही लेणी कोरण्याची कला महाराष्ट्रात सुमारे हजार बाराशे वर्षे बहरली. येथेच ही लेणी कोरली कारण यास महाराष्ट्रातील अश्मीभूत खडक (डेक्कन ट्रॅप) हा कठीण दगड कोरण्यास अत्यंत सोयीचा वाटला. तसेच डोंगरात अगदी निवांत जागी, वनश्री व पाण्याची सोय असलेली ठिकाणे निवडली गेली. परंतु यातील बरीचशी केंद्रे तत्कालीन व्यापारी मार्गापासून जवळ कोरली गेली.

जुन्नरमधील सर्व लेणी बौद्धधर्मातील हीनयान पंथीयांनी कोरली. या पंथात बुद्धाची प्रतीकात्मक स्वरूपात पूजा केली जात असे. त्यात चैत्य, स्तूप, धर्मचक्र, बोधिवृक्ष, पादुका वगैरेंचा समावेश असे. चैत्य आणि स्तूप हे बुद्धाच्या महापरिनिर्वाणाचे प्रतीक मानले गेले. धर्मचक्र हे त्याचे प्रवचन, तसेच बुद्ध-धर्म आणि संघास शरण जाण्याचे प्रतीक. बोधिवृक्षाखाली (पिंपळाचे झाड) त्याला ज्ञानप्राप्ती झाली. पादुका हे त्याच्या पदकमलाचे प्रतीक मानले गेले. याउलट महायानपंथीयात, विशेषतः बुद्धाच्या अनेक आसनांतील त्याच्याशी संबंधित असलेल्या इतर देवदेवतांची लोक मूर्तीरूपात पूजा करू लागले. हे सर्व हिंदू धर्मातील चालीरीतीचे अनुकरण केले गेले.

आता जुन्नर येथील लेण्यांचे मुख्यतः दोन प्रकार आहेत. पहिला म्हणजे बुद्ध भिक्षूंच्या पूजा-अर्चेसाठी चैत्यगृह आणि दुसरा त्यांच्या निवासासाठी विहार. दोन्हींचा आलेख कालमानानुसार व गरजेनुसार बदलत जातो.

जुन्नरमध्ये चैत्यगृहाचे साधारण चार प्रकारचे आलेख येतात ते असे-- (१) वर्तुळाकारमध्ये स्तूप व त्याच्या सभोवताली स्तंभ, (२) गजपृष्ठाकृती छत घुमटाकार किंवा चापाकार, दर्शनी भागावर चैत्यगवाक्ष, आत मागील बाजूस स्तूप व मागील व दोन्ही बाजूस स्तंभाची रांग, छत पिंपाकृती अपूर्ण राहिलेल्यात स्तंभ येत नाहीत, (३) दर्शनी स्तंभ, आतील आलेख चौरस, मध्ये स्तूप व सपाट छत, (४) यातही दर्शनी स्तंभ, आत काटकोनात मंडप किंवा सभागृह, मागील बाजूस स्तूप व सपाट छत.

विहाराचे प्रकार मुख्यतः दोन आहेत. पहिल्यात प्रथम ओसरी, ओसरी स्तंभासह किंवा स्तंभरहित, एक प्रवेशद्वार. क्वचित त्याच्या दोन्ही बाजूस खिडक्या, आत चौरस मंडप, मंडपाच्या मागील व बाजूच्या भिंतीत भिक्षूंना झोपण्यासाठी खोल्या, त्यात काहीत दगडी बाकांची व्यवस्था. काहीत खोल्यांच्या समोर तिन्ही बाजूस दगडी बाक आणि सपाट छत. दुसरा प्रकार अगदी साधा आहे. त्यात प्रथम छोटीशी ओसरी, प्रवेशद्वाराच्या आत चौरस मंडप, सपाट छत, क्वचित मागील व बाजूच्या भिंतीत दगडी बाक आणि सपाट

छत. अनेक लेण्यांना लागून अगर जवळपास लहान व मोठे पाण्याचे कुंडही खोदले गेले.

या सर्व लेण्यांचा कालखंड सुमारे इसवी सनापूर्वीच्या पहिल्या शतकाच्या मध्यापासून ते साधारण इसवी सनानंतरच्या दुसऱ्या शतकाअखेरपर्यंत. म्हणजे साधारण अडीचशे वर्षे जुन्नरला लेणी कोरली जात होती.

जुन्नर परिसरातील डोंगरात एकूण किती लेणी आहेत याचा नक्की आकडा देणे कठीण आहे. कारण काही लेणी बुजलेली आहेत, काही दाट झुडपाआड आहेत, काही दुरून कडेकपारीत दिसतात, पण तेथे जाण्याचे मार्ग तुटल्यामुळे तेथपर्यंत जाणे अत्यंत अवघड आहे.


प्रस्तुत लेखकाने जुन्नर शैलगृहांचा अभ्यास केला, त्यावेळी तेथे ज्ञात असलेली सर्व लेणी, पाण्याची कुंडे व शिलालेख यांची गणती केली त्याचा तक्ता पुढे दिला आहे. जुन्नरमध्ये लेण्यांचे एकूण नऊ गट आहेत. या सर्वांत मिळून एकूण १८४ लेणी कोरली आहेत. त्यात काही अपूर्ण असली तरी त्यांचा विशिष्ट आकार व त्यांचे प्रयोजन याची कल्पना येते. याशिवाय २५ अपूर्ण लेणी, ज्यांना विशिष्ट आकार नाही, परंतु प्रयत्न केल्याचे व ज्यांना लेणी म्हणता येणार नाही अशी आहेत. या सर्व लेण्यांच्या परिसरात ११५ पाण्याची कुंडे खोदली गेली आहेत. या सर्व समूहांत एकूण ३६ शिलालेख आहेत. ते फारच सुबकरीतीने कोरले आहेत. त्यातील बहुतेक सर्व वाचता येतात. त्यातील फारच थोड्यांचे अर्थ लागत नाहीत. हे शिलालेख ब्राह्मी लिपीत व प्राकृत भाषेत आहेत. त्यात कोणी व कशासाठी दान दिले याचा उल्लेख आहे. शिला-लेखातील समाविष्ट असलेल्या गोष्टींवरून तत्कालीन सामाजिक, आर्थिक, धार्मिक वगैरे इतर बाबींवर प्रकाश पडू शकतो.

ही सर्व लेणी व शिलालेख यांची माहिती आपणास या छोट्या पुस्तिकेत देता येणार नाही व त्याची आवश्यकताही नाही. यातील फक्त निवडक लेणी व शिलालेखांची माहिती दिली आहे. काही निवडक शिलालेखाचे पाठ व त्याचा स्वैर अनुवादही दिला आहे. जिज्ञासूंना ही माहिती रोचक वाटेल असे वाटते. ब्राह्मी लिपी मौर्यकालात भारतात सुरू झाली व तिचा पुढे विकास झाला. आजची आपली देवनागरी, गुजराती, बंगाली वगैरेंचे मूळ ब्राह्मी लिपीत आहे. तसेच प्राकृत भाषा बोजड संस्कृतमधून बोली भाषेत आली. आजची आपली मराठी भाषा ही प्राकृतचेच एक रूप आहे.


आज आपण मराठी भाषेत 'लेणे', 'लेणी' हा शब्द वापरतो. जुन्नर आणि महाराष्ट्रातल्या इतर लेण्यांतील काही शिलालेखात यास 'लयन', 'लेणं' हा शब्द आलेला आहे. तसेच पाण्याचे कुंड किंवा टाक्यास 'पोढी' हा शब्द आजच्या वापरात असलेल्या 'पाणपोयी'शी जुळणारा आहे. यावरून तत्कालीन लिपी व भाषा या आपल्याशी किती निकट आहेत याची कल्पना येईल.

जुन्नर लेणी पाहण्यास कोठून सुरुवात करावी हे प्रत्येक पर्यटकाला त्याच्या सोयीनुसार ठरवावे लागेल. बहुतेकजण शिवनेरी किल्ला व गणेश लेण्यातील (लेण्याद्री) गणेशाचे (अष्टविनायक) दर्शन करण्यास येतात. तेव्हा तेथून सुरुवात करता येईल. खालील तक्त्यात लेण्यांचे गट, लेण्यांचे प्रकार, पाण्याची कुंडे व शिलालेखांची यादी दिली आहे :


| गट समूह | चैत्यगृहे | विहार व सामान्य खोल्या | अपूर्ण लेणी | पाण्याची कुंडे | एकूण संख्या | शिला लेख |
|---|---|---|---|---|---|---|
| १. तुळजा लेणी .. | १ | १२ | ३ | २ | १८ | .. |
| २. गणेश लेणी .. | २ | २८ | ३ | १५ | ४८ | ६ |
| ३. गणेश लेण्याच्या पूर्वेचा एकांगी गट. | १ | ७ | .. | .. | ८ | .. |
| ४. भीमाशंकर गट .. | १ | १७ | ७ | १३ | ३८ | ३ |
| ५. अंबा-अंबिका गट .. | १ | १७ | ४ | ११ | ३३ | १५ |
| ६. भूत लेणी गट .. | १ | १५ | ५ | १४ | ३५ | ३ |
| ७. शिवनेरी पूर्व गट .. | २ | ५१ | २ | ४० | ९५ | ६ |
| ८. शिवनेरी दक्षिण गट. | १ | २१ | १ | १४ | ३७ | ३ |
| ९. शिवनेरी पश्चिम गट. | .. | ६ | .. | ६ | १२ | .. |
| एकूण .. | १० | १७४ | २५ | ११५ | ३२४ | ३६ |




शिवनेरी किल्ला



शिवनेरी किल्ल्यावरील
श्रीशिवाजीमहाराजांचे
जन्मस्थान




शिवनेरी किल्ल्यावरील
शिवाई मंदिर



शिवनेरी
किल्ल्यावरील
कमानी मशीद

जुन्नर : कुकडी नदीच्या
किनाऱ्यावरील प्राचीन
वस्तीच्या टेकड्या
↓





जुन्नर : गणेश लेणीच्या
पूर्वेकडील चैत्यगृह क्र. २




जुन्नर : भूतलेणी
चैत्यगृह क्र. ४०
दर्शनी भाग

गणेश लेणी : आधुनिक
अष्टविनायक गणेश मंदिर,
विहार क्र. ७






भीमाशंकर लेणी :
चैत्यगृह क्र. २,
दर्शनी भाग




जुन्नर : तुळजा लेणी गटातील वर्तुळाकृती चैत्यगृह क्र. ३



भूतलेणी
चैत्यगृह
क्र. ४०
वरील गरुड
व नागराज



जुन्नर :
गणेश
लेणी
क्र. ६
दर्शनी
भाग





अंबा-अंबिका लेणी
चैत्यगृह क्र. २७
दर्शनी भाग

अंबा-अंबिका
गटातील दोन
मजली लेण्या
↓




जुन्नर : शिवनेरी
पूर्वेकडील
चैत्यगृह क्र. ४८
दर्शनी भाग







जुन्नर : शिवनेरी
पूर्वेकडील
चैत्यगृह क्र. ४८
आतील स्तूप व
छतावरील रंगकाम



नाणेघाट खिंड



जीवधन किल्ला : घाटघर


जुन्नर परिसर
० ३ मैल
० ५ कि.मि.
पारगांव
वाटकहाळे
शितेवाडी
वरदा डोंगर ३५००
नानेघाट
वाघेवाडी
घाटघर
३५०० जीवधन
जलवंडे
पोलु
सोनावळे
हडसर ३५००
खडकुंबे
उसरन
कुकडी नदी
पूर
कुकडेश्वर
चावंड ३०००
ढाक
आंबोली
राजुर
कासारवाडी
बल्लाळवाडी
ग
ग.पु.
माणिकडोह
पाडळी
आपटाळे
सुराळे
तु
जुन्नर
गोळेगांव
कुमशेत
शिरोली
राळेगांव
खानगांव
बोत्तारडे
अमळेचीवाडी
बेलसर
निरगुडे
शि.प
शि.पू.
३२५०
शि.द
भू
अ.आ
भि
कुसुर
येणेरे
काटेडे
बागलोहरे
खानापूर
धामनखेल
नारायणगांव कडे
मीना नदी
वडज
निमदरी
निमगांव
सावरगांव
भि. - भिमाशंकर गट
अं.आ. - अंबा आंबिका गट
भू. - भूत लेणी गट
मानमोडी टेकडी
शि.पू. - शिवनेरी पूर्व गट
शि.द. - शिवनेरी दक्षिण गट
शि.प. - शिवनेरी पश्चिम गट
शिवनेरी किल्ला
तु. - तुळजा लेणी
ग. - गणेश लेणी
ग.पु. - गणेश लेणी पूर्व
- लेणी गट दर्शक
- प्राचीन सार्थवाह पथ
- पायवाट

## तुळजा लेणी गट

ही तुळजा लेणी जुन्नर गावाच्या पश्चिमेस सुमारे साडेतीन किलोमीटर अंतरावर आहेत. अर्धा मार्ग चांगला रस्ता व पुढे पाऊलवाटेने जावे लागते. या उत्तराभिमुख असून त्यात एकूण तेरा लेणी आहेत. पैकी क्रमांक तीन हे चैत्यगृह, एक-दोन विहार व इतर सामान्य खोल्या आहेत. त्यातील बहुतेकांचे प्रवेशद्वार काळाच्या ओघात तुटलेले आहे. क्रमांक २ हा विहार असून आत चौरस मंडप किंवा सभागृह आहे. आतील डावीकडील व मागील भिंतीत प्रत्येकी दोन व उजवीत एक अशा एकूण पाच खोल्या बुद्धभिक्षूंच्या निवासासाठी खोदलेल्या आहेत. क्रमांक ३ हे चैत्यगृह असून त्याचा आलेख वर्तुळाकार, त्याचा व्यास ८.२३ मीटर व जमिनीपासून छतापर्यंतची उंची ७.६२ मीटर आहे. मध्ये साधा स्तूप असून त्याचा खालील भाग पिपासारखा व वरील भाग घुमटाकृती आहे. घुमटाच्या वरची हर्मिका नष्ट झालेली आहे. घुमटाच्या वर चौरस खाच असून त्यात लाकडी छत्र दंडासहित बसविलेले होते; ते आता नष्ट झाले आहे. पुण्याजवळील कार्ले येथील चैत्यगृहातील लाकडी छत्र आजतागायत शिल्लक राहिले आहे. स्तूपाच्या भोवती साधे बारा अष्टकोनी स्तंभ असून त्यांचा खालचा भाग रुंद व वरती थोड्या प्रमाणात निमुळता होत गेलेला आहे. स्तंभाच्या भोवती वर्तुळाकार प्रदक्षिणापथ आहे. अर्धस्तूपाच्या वर घुमटाकार छत असून, त्यावर प्रदक्षिणेच्या छतावर लेणे कोरले त्यावेळी लाकडी फासळ्या (तुळया) बसविल्या होत्या; व त्याची खूण सूक्ष्म दृष्टीने पाहिले असता दिसते. तसेच छतावर व बाजूच्या भितींवर मातीचा गिलावा लावून त्यावर रंगीत चित्रे काढली होती. प्रदक्षिणेच्या उजव्या बाजूच्या छतावर अद्यापही काळपट झालेले कमलपुष्पांचे अवशेष दिसतात. अष्टकोनी खांबावरही चित्रे काढली होती. त्यांचे काही ठिकाणी (प्रवेशाजवळील डाव्या खांबावर) पुसट अवशेष दिसतात. वरील दर्शनी भाग तुटलेला असल्यामुळे त्यावर नेहमीचे चैत्यगवाक्ष होते की नाही ते सांगणे कठीण आहे. चैत्याचा गोल आकार व वर्तुळात मांडणी केलेले स्तंभ असे हे महाराष्ट्रातील एकुलते एक चैत्यगृह आहे. यातील स्तंभ व स्तूपाच्या पद्धतीवरून, भाजे, पितळखोरे क्रमांक ३, अजंठा क्रमांक १०, कोंडाणे वगैरे चैत्यगृहांशी काही प्रमाणात साम्य होते. त्याचा काळ इसवी सन पूर्व पहिले शतक समजला जातो; त्यावरून तुळजा लेणी चैत्याचाही तोच काळ असावा. यावरून संपूर्ण जुन्नरमधील लेण्यांत हे लेणे प्रथम कोरले गेले हे सिद्ध होते.

**लेणे क्रमांक ४ व ५**—लहानसा विहार असून त्याचा दर्शनी भाग तुटला आहे. डावीकडील मागील बाजूस दोन खोल्या असून एकीस आधुनिक लाकडी

चौकट बसविली आहे आणि बाजूच्या खोलीत तुळजादेवीची स्थापना मध्ययुगीन कालात केव्हातरी झालेली आहे. देवीचे स्थान व वार्षिक यात्रेमुळे देवीच्या नावावरून या गटास व डोंगरास 'तुळजादेवी लेणी' असे नाव दिले गेले.

**लेणी क्रमांक ५ ते १२.**—यांचा दर्शनी भाग संपूर्णपणे तुटलेला आहे. क्रमांक ८ ते १२ पर्यंत कडयाच्या वरच्या अंगास काही कलाकुसर व थोडेबहुत शिल्प राहिले आहे. त्यात वेलबुट्टी, वेदिका, चैत्यकमानी इत्यादी सुबक कोरलेल्या दिसतात. शिल्पात स्तूपाची पूजा करणारे भक्त, जोडपी व उडता किन्नर किंवा गंधर्व दिसतात. किन्नराचा कमरेवरील भाग मानवी असून त्याने तुरेदार फेटा परिधान केला आहे; त्याला पक्ष्याचे पाय व मोरपिसारा आहे. हे शिल्प, कलाकुसर थोडी असली तरी, शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. या कलाकुसरीचे व शिल्पाचे साम्य जुन्नरमधील भूत लेणी गटांतही पहाण्यास मिळते. ते इसवी सनाच्या पहिल्या शतकाच्या मध्यास कोरले असावे.

**लेणे क्रमांक १३.**—हे या गटातील शेवटचे लेणे असून बऱ्याच पायऱ्या चढून गेल्यानंतर लागते. याचाही दर्शनी भाग तुटलेला असून आतील चौरस मंडपात बाजूच्या व मागील भितीत खालच्या अंगास दगडी बाक कोरलेले आहेत. याचा बैठक किंवा सभागृहासाठी उपयोग केला असावा.

**गणेश लेणी (लेण्याद्री) गट**

जुन्नर गावापासून ५ किलोमीटर उत्तरेस, कुकडी नदी ओलांडून या गटास जावे लागते. रस्ता चांगला असून पायी व मोटारने जाता येते. अर्धा रस्ता ओलांडल्यावर दुरून लेणी दिसू लागतात. जवळ गेले असता डोंगराच्या पायथ्यापासून वरील मध्यावर असलेल्या दोन लेण्या दिसू लागतात. उजवीकडील चैत्यकमान असलेले चैत्यगृह व डावीकडील स्तंभांची रांग असलेले विहार आहेत. वर जाण्यास घडीव दगडांच्या बऱ्याच पायऱ्या आहेत. या गटात एकूण ३० लेणी असून, त्यात दोन चैत्यगृहे व बाकीचे विहार व साध्या खोल्या आहेत; शिवाय ६ शिलालेखही आहेत. लेण्यांचा क्रम साधारण ईशान्येकडून नैऋत्येकडे आहे.

**क्रमांक १ ते ४**—ही लेणी सामान्य प्रतीची आहेत. त्यास बाहेर ओसरी असून आतमध्ये भिक्षूंच्या निवासासाठी खोल्या व दगडी बाक कोरलेले आहेत.

**लेणे क्रमांक ५**—हा एक लहानसाच पण महत्त्वाचा विहार आहे. यास बाहेर ओसरी असून आत काटकोनी मंडप किंवा सभागृह असून बाजूच्या व मागील

भिंतीत दगडी बाक कोरलेले आहेत. यास मागील व उजवीकडील भिंतीत प्रत्येकी तीन व डावीकडील भिंतीत दोन अशा एकूण सात खोल्या आहेत. काहीत दगडी बाक कोरलेले आहेत. बाहेरील ओसरीच्या डाव्या बाजूस पाण्याचे कुंड खोदले आहे. प्रत्येक द्वाराच्या डाव्या बाजूस व खिडकीच्या वर एका ओळीत सुबक अक्षरात कोरलेला शिलालेख आहे. त्याच्या डाव्या बाजूस सुरवातीस त्रिरत्न व ओळीच्या अखेरीस स्वस्तिक ही शुभचिन्हे कोरली आहेत.

**धनिकसेणिय सतगभं पोढिच देयधमं**

**स्वैर अनुवाद** : सात खोल्या (दालने) असलेले (लेणे) आणि पाण्याचे कुंड (पोढि) धान्याच्या व्यापाऱ्यांनी दान केले.

यात किती व्यापारी व त्यांची नावे दिली नाहीत फक्त त्यांचा व्यवसाय दिला आहे. बहुतेक हे जुन्नरचे व्यापारी असावेत. बौद्ध भिक्षूंच्या निवासासाठी खोल्या व पाण्याची व्यवस्था करणे यासाठी व्यापाऱ्यांनी पुण्यकर्म केल्याचे दिसते.

**लेणे क्रमांक ६**—हे चैत्यगृह दक्षिणाभिमुख असून महाराष्ट्रातील अनेक चैत्यांपैकी एक उत्कृष्ट नमुना आहे. त्याच्या दर्शनी भागास वरच्या अंगास अपूर्ण चैत्यकमान आरपार कोरली नसून ती सपाट आहे, हे याचे वैशिष्ट आहे. खालच्या बाजूस प्रवेशाजवळ मध्ये दोन पूर्ण स्तंभ व कडेस प्रत्येकी एक अर्धस्तंभ आहे. चौरस निमुळत्या होत गेलेल्या पायऱ्या किंवा चबुतऱ्यावर पूर्णकुंभ, त्यातून निघालेला अष्टकोनी खांब, याच्यावर पुन्हा एक उपडा कलश, पुन्हा उलटचा निमुळत्या पायऱ्या किंवा चबुतरा आणि यावर पाठीला पाठ टेकून बसलेले हत्ती (आतील बाजूस सिंह) आहेत. चैत्यमंदिराचे हे द्वारसंरक्षक अशी या मागे कल्पना असावी. या खांबाच्या मागे ओसरी व मोठ्या प्रवेशद्वारातून आपण आत जातो. आतमध्ये याचा आलेख गजपृष्ठाकृती किंवा चापाकार आहे. छत अर्धगोलाकार किंवा पिंपासारखे आहे. त्यावर दगडी तुळया (फासळ्या) कोरल्या आहेत. या दगडी तुळया लाकडी बांधकामाच्या प्रतिकृती आहेत.

मागच्या अंगास अखंड दगडात स्तूप कोरला असून खालच्या पिंपासारख्या आकारावर वेदिकापट्टी, त्यावर घुमट व हर्मिका कोरलेली आहे. हर्मिकेचा वरील भाग सपाट असून मध्ये लाकडी छतासाठी खोबण कोरलेली आहे.

दरवाजाच्या आतील बाजूस अर्धस्तंभ व त्याच्या मागे, डावीकडे अन उजवीकडे एकूण सोळा स्तंभ आहेत. स्तूपाच्या मागील सहा स्तंभ साधे अष्टकोनी आहेत; तर बाकीचे ओसरीतील स्तंभासारखेच अलंकृत आहेत. त्यावर बाहेरच्या प्रमाणेच पाठीला पाठ टेकून बसलेले हत्ती व सिंह आहेत. शिवाय

डावीकडील दुसरा व उजवीकडील चवथा यात स्त्रीमुखे असलेले स्फिंक्स कोरले आहेत. त्यांचे शरीर घोड्यासारखे दिसते. हे एक या चैत्यगृहाचे वैशिष्टच म्हणता येईल. अशाच प्रकारची स्त्रीमुखे असलेले स्फिंक्स भाजे व पितळखोरे लेण्यातही कोरले आहेत. इजिप्तमध्ये गीझा येथील चार हजार वर्षांपूर्वीच्या पिरॅमिडजवळ सिंह आणि मानवाच्या रूपात स्फिंक्स दाखविला आहे. कालांतराने ग्रीस देशात स्त्री रूपात स्फिंक्स येतो. ती तत्कालीन ग्रीकांची आवडती देवता होती. यवन किंवा ग्रीक यांचा भारताशी मौर्य कालापूर्वीपासून पुढे अनेक शतके संबंध आला. त्यांच्या प्रेरणेने वरील प्रकारचे स्फिंक्स महाराष्ट्रातील लेण्यांत कोरले असावेत असे वाटते. एका संस्कृतीचा दुसऱ्या संस्कृतीवर कसा प्रभाव पडतो किंवा संबंध येतो हे या उदाहरणावरून दिसून येते.

प्रवेशद्वाराच्या वरती सुबक अक्षरात एका ओळीत लांबलचक लेख कोरलेला आहे. त्याच्या सुरुवातीस व शेवटी स्वस्तिक हे शुभचिन्हही कोरलेले आहे.

**कलीअणस हेरणिकपुतस सुलसदतस एकपुरिसस चेतियघरो नियुतो देयधम.**

**स्वैर अनुवाद** : कल्याणचा हेरणिक याचा ख्यातकीर्त पुत्र सुलसदत्त याने चैत्यगृहास अर्पण केले.

जुन्नरमधीलच नव्हे तर बाहेरीलही लोक देणग्या देत हे यावरून समजते. कल्याण तसेच मुंबईजवळील नाला-सोपारा (प्राचीन शूर्पारक) आणि चौल (चेऊल) ही तत्कालीन महत्त्वाची व्यापारी बंदरे बौद्धधर्मीयांची मुख्य स्थाने होती.

**लेणे क्रमांक ७**——वरील चैत्यगृहाच्या डावीकडे, थोडेसे उंचावर पायऱ्या चढून गेले असता हा भव्य विहार लागतो. जुन्नरमधील लेण्यांत हा आकाराने सर्वांत मोठा आहे. सुरुवातीस सांगितल्याप्रमाणे पूर्वीच्या हीनयानपंथी बुद्ध-धर्मीय लेण्यांचे मध्ययुगीन कालात अष्टविनायक गणेशाचे मंदिरात रूपांतर केले गेले. गणेशभक्तांचे हे आवडते यात्रास्थान आहे. पूजा-अर्चा, होमहवनासाठी जुन्नर गावात यासाठी कायम पुजारी नेमलेला आहे.

विहाराच्या प्रांगणात व डावीकडे पाण्याची कुंडे खोदलेली आहेत तर दर्शनी भागावर दगडी बाकावर आधारित सहा स्तंभ आणि दोन्ही बाजूच्या कडेस अर्धस्तंभ कोरलेले आहेत. दगडी बाकास पाठ टेकण्यास कक्षासने व त्याच्या बाहेरील बाजूस वेदिकापट्टीचे नक्षीकाम केलेले दिसते. स्तंभावर वरील अंगास

पाठीला पाठ टेकून बसलेले सिंह, हत्ती व बैल कोरले आहेत. काहींच्या पाठीवर माणसे बसलेली आहेत. प्रवेशाजवळील डाव्या व उजव्या स्तंभावर हत्तीच्या सोंडेत कमलपुष्पे दिसतात.

भव्य सभामंडपात जाण्यासाठी मध्ये मुख्य दरवाजा व त्याच्या दोन्ही बाजूस एक-एक लहान दरवाजा व त्यांच्यामध्ये मोठ्या खिडक्या कोरल्या आहेत. हा मंडप १७.३९ मीटर खोल, १५.५५ मीटर रुंद व ३.३८ मीटर उंच असून मंडपात कोठेही खांबांचा आधार नाही. मंडपाच्या तिन्ही बाजूस दगडात कोरलेला अखंड बाक आहे. दोन्ही बाजूच्या भिंतीत प्रत्येकी ७ व मागील भिंतीत ६ अशा एकूण २० खोल्या भिक्षूंच्या निवासासाठी कोरल्या आहेत. त्यातील तीन सोडून बाकी सर्व खोल्यांतील मागील भिंतीवर दगडी बाक कोरले आहेत. मागील भिंतीतील मधल्या दोन खोल्यांचे प्रवेशद्वार व मधली भिंत तोडून व खोलीचा आकार वाढवून गणेशाची शेंदूर लावलेली मूर्ती दिसते. या गर्भगृहाच्या डावीकडील खोलीत मराठाकालीन काही भित्तीचित्रे आहेत. त्यात दत्तात्रेय, शिव व त्याच्या मांडीवर बसलेले गणेश व पार्वती, गणेश व त्याच्या मांडीवर दोन स्त्रिया, स्त्रीबरोबर सारीपाट खेळणारा गणेश, नारदमुनी व साधू यांचा चित्रात समावेश आहे. चित्रशैलीवरून ही पेशव्यांच्या काळात काढली असावीत असे वाटते.

**लेणे क्रमांक ८**––या लेण्याचा आलेख मजेशीर आहे. यास समोर ओसरी असून डावीकडे एक दगडी बाकासहित खोली व उजव्या अंगास चिंचोळा रस्ता असून त्याच्या मागील भिंतीत अगदी अरुंद दगडी बाक आहे; याचा उपयोग झोपण्यासाठी होणे कठीण आहे. या जागेचा उपयोग बुद्ध भिक्षूंनी कदाचित् ध्यानस्थ बसण्यासाठी केला असावा. अशा प्रकारची बरीच लेणी या गटात आहेत. उदाहरणार्थ, क्रमांक २, १०, १२, १३, १७, १८, २४, २६, २७ व २९ तसेच शिवनेरी दक्षिण गटात क्रमांक ५५, ५६, ६०, ६१, ६६ आणि ६९.

**लेणे क्रमांक १४**––हे या गटातील दुसरे चैत्यगृह आहे. परंतु याचा आकार गजपृष्ठाकृती नसून काटकोनी आहे. दर्शनी भागावर कलश व अष्टकोनी स्तंभ पूर्वी होते; त्यांचे काही अवशेष छतावर शिल्लक आहेत. घराच्या छतास लाकडी तुळया लावतात तसेच येथेही बाहेरील छतावर तुळयांची प्रतिकृती दगडात दिसते.

या चैत्यगृहाचे वैशिष्टच म्हणजे याच्या आतील मंडपाचे छत सपाट असून, मागील बाजूस भिंतीपासून अलग असलेला स्तूप कोरलेला आहे. त्यावर वेदिकापट्टी, हर्मिका व छतात कोरलेली छत्री आहे. स्तूप, भिंती व छतावर मातीचा गिलावा व रंगकाम केल्याचे काही अवशेष दिसतात. अगोदर पाहिलेल्या

चैत्यगृहापेक्षा (गणेश लेणे क्रमांक ६ व तुळजा लेणे क्रमांक ३) यात गरजेनुसार अगर आवडीनुसार कारागिराने कसा बदल केला याची आपणास कल्पना करता येते.

या सुंदर चैत्यगृहाच्या दरवाज्याच्या उजव्या बाजूस, छताच्या थोडेसे खाली, ब्राह्मी लिपीत दोन ओळींचा शिलालेख आहे. त्याची अक्षरवटिका फारच सुबक असून दोन्ही ओळींच्या सुरुवातीस आणि शेवटी त्रिरत्न, श्रीवत्स आणि स्वस्तिक ही शुभचिन्हे कोरली आहेत.

**कपिल उपासकस, तापस उपासकस पुतस, आनंदस देयधंमं चेतियघरो नियुतो.**

**अनुवाद** : उपासक तापस यांचा पुत्र आणि उपासक कपिल यांचा नातू आनंद याने हे चैत्यगृह पुण्यकर्मार्थ दान दिले.

**लेणे क्रमांक १५ ते १९**—याचा आलेख बराचसा वरील लेणे क्रमांक ८ शी जुळतो. परंतु यांतील बऱ्याच लेण्यांचे दर्शनी भाग व आतील काही भिंती पडल्या आहेत. ठिसूळ दगडाचा थर याच्या मध्यातून गेला असल्यामुळे काळाच्या ओघात यांची पडझड झाली.

**लेणे क्रमांक २०**—हे लेणे नसून एका ओळीत पाण्याची तीन कुंडे आहेत. त्यांतील दोन कुंडांवर दान दिल्याचे लेख आहेत. पहिल्यात "कल्याणचा सुवर्णकार कुडीर याचा मुलगा सधक याने हे कुंड (पोढि) कोरण्यास दान दिले" असा उल्लेख आहे. दुसऱ्या कुंडासाठी दोन स्त्रियांनी दान दिले ते असे : "तोरिकाची पत्नी लक्ष्मी आणि ऋषी मूल्यस्वामीची पत्नी नादवालिका यांनी या कुंडासाठी (पोढिस) दान दिले." भिक्षूंना लेण्यांच्या जवळ पाण्याचे कुंड खोदण्यास दान देणे हे त्याकाळी महत्कृत्य समजले जात असे हे यावरून दिसते.

**लेणे क्रमांक २१**—हा भव्य मंडप असून त्याच्या आतील तीन भिंतीत लागून दगडी वाक कोरलेला आहे. बाहेर डाव्या बाजूस विशाल कुंड आहे.

**लेणे क्रमांक २५ ते २८**—वरील लेणे क्रमांक ८ प्रमाणेच थोडचाफार प्रमाणाने यांचा आलेख आहे.

**लेणे क्रमांक २६**—वर दर्शनी भिंतीत डाव्या बाजूस तीन ओळींचा शिलालेख आहे तो असा :—

**सामरूपासकस पुतस**
**सिवभूतिस देयधम लेणं**
**कपीचिते संघस नियुतं क (?)**

**अनुवाद** : कपीचितच्या संघास उपासक सामर याचा पुत्र शिवभूती नेया हे लेणे दान दिले.

प्राचीन काळी गणेश लेण्यात, कपिचित नावाचा संघ होता हे यावरून दिसते. 'लेण' हा शब्द आजही मराठी भाषेत 'लेणे' या नावाने प्रचलित आहे. अलंकार अशा अर्थानेही हा शब्द वापरला जातो.

**गणेश लेणी-पूर्व**

या आडवाजूला असलेल्या लेणीसमूहास जाण्यासाठी लेण्याद्री डोंगराच्या पायथ्यापासून पूर्वेकडे, सुमारे दीड किलोमीटर अंतरावर, बल्लाळवाडीच्या साधारण वायव्येस असलेल्या दोन डोंगराच्या घळीत जावे लागते. महाराष्ट्र शासन वनविभागाने या घळीत सागाची झाडे लावली आहेत. येथून डोंगरावर थोड्याशा अवघड वाटेने चढावे लागते. उजव्या डोंगरावर पाच व त्याच्या विरुद्ध बाजूच्या डोंगरावर तीन अशी एकूण आठ लेणी येथे आहेत.

तेथे जाण्यास दुसरा मार्ग असाही आहे : गणेशलेणीच्या पायऱ्या उतरताना साधारण मध्यास आल्यावर डावीकडे डोंगरावरून जाता येते. नागमोडी वळणाच्या डोंगरावरील पाऊलवाटेने हा जवळचा मार्ग आहे. पण काही ठिकाणी घसरण आहे. लेण्याच्या जवळ आल्यावर दुरूनच यातील एक भव्य चैत्यगृहाचा दर्शनी भाग मन वेधून घेतो व जवळ जाऊन पाहण्याची उत्सुकता वाढते. उजव्या बाजूस चैत्य व डाव्या बाजूस विहार आहेत. चैत्याचा दर्शनी भाग सरळ उभ्या असलेल्या (किंवा जमिनीशी काटकोनात) उंच कपारीत कोरला असून दर्शनी भागाची उंची ७.६२ मी. व रुंदी ६.१० मी. इतकी आहे. नक्षीकामाचा एक अप्रतिम नमुना म्हणून याच्या दर्शनी भागाचा उल्लेख करावा लागेल. प्रवेशद्वार थोडेसे रुंद असून त्यावर व त्याच्याशी समांतर दोन्ही बाजूस अशा एकूण ३ चैत्य कमानी कोरल्या आहेत. त्याच्या वरच्या अंगास लहानशी अरुंद गच्ची आहे. गच्चीच्या वर पिंपळाच्या पानाच्या आकारासारखे एक देखणे चैत्यगवाक्ष असून ते आरपार कोरलेले आहे. संपूर्ण गवाक्षाच्या अर्धवर्तुळाकार पट्टीवर एकात एक गुंफलेली सहा पाकळ्यांची फुले कोरली आहेत. एका पाकळीची दुसऱ्या पाकळीशी गुंफण फारच प्रमाणबद्ध कोरलेली आहे. वरील टोकास त्रिरत्नांचे चिन्ह आहे. महाराष्ट्रातील कोणत्याही भव्य चैत्यगवाक्षाच्या पट्टीवर याच्यासारखी नक्षी कोरलेली नाही आणि हेच या चैत्याचे खास वैशिष्टच आहे. चैत्य कमानीच्या वरील अंगास दोन लहान चैत्य कमानी असून त्यात स्तूप कोरलेले आहेत. गवाक्षाच्या उजव्या बाजूस एकात एक गुंफलेल्या त्रिदलाची नक्षी व त्याच्या उजव्या बाजूच्या भिंतीवर स्वस्तिकाचा पट्टा चैत्य कमानीच्या दोन्ही बाजूस कोरला आहे. तसेच उजव्या भिंतीतील चैत्य कमानीत पीठावर धर्मचक्र कोरले आहे. याच्यावर पुन्हा लहान चैत्य कमानी व वेदिकापट्टीची नक्षी दिसते. डाव्या बाजूच्या भिंतीवर असेच कोरीव काम असून मोठ्या कमानीत

बोधिवृक्ष दाखविला आहे. ही सर्व चिन्हे बुद्धाचे जीवन, साक्षात्कार, धर्मप्रवचन आणि महापरिनिर्वाण दर्शवितात. यातील त्रिदल नक्षीचे खास वैशिष्टच आहे. नाशिकच्या चैत्यगृहाच्या दर्शनी भागावर ही कोरली आहे. बाकी महाराष्ट्रातील कोणत्याही लेण्यांत ही दिसत नाही. प्राचीन ग्रीक नाण्यांच्या वर हे चिन्ह दाखविले आहे. सुरुवातीस येथून जवळच असलेल्या बल्लाळवाडीनजीक इरॉस या ग्रीक देवतेचे लहानसे शिल्प सापडल्याचा उल्लेख आलेला आहे. तसेच गणेशलेणी क्रमांक ६ या चैत्यातील स्फिंक्सचाही उल्लेख आला आहे. या सर्व निरीक्षणावरून असे वाटते की, देणगी देणारा किंवा कारागीर यवन म्हणजे ग्रीक असावा.

चैत्याच्या आत, मागील भिंतीपासून अलग असलेला, हर्मिकेसह स्तूप दिसतो. गृहाचा आलेख गजपृष्ठाकृती किंवा चापाकार आहे. तसेच छत पिंपाकृती आहे. स्तूपाच्या मागील उजव्या भिंतीचे निरीक्षण केले असता असे दिसते की, त्यातील दोन पट्टयांत छिन्नी, हातोडयाचे घाव आहेत ते गुहा कोरण्याचे काम चालू असल्याचे दर्शवितात. भिंत सरळ रेषेत अन् थोडीशी वाढवण्याचा हा प्रयत्न होता. परंतु हे सर्व काम अपूर्ण राहिले. ते पूर्ण झाले असते तर आपणास यात स्तंभांच्या रांगा, स्तूपाच्या हर्मिकेवर छत्र आणि छतास लाकडी कडेपाट दिसला असता. हे चैत्यगृह सर्वार्थाने पूर्ण कोरले गेले असते तर महाराष्ट्रातील लेण्यात हे उत्कृष्ट ठरले असते. याचा आलेख व सर्वसाधारण कलाकुसर नाशिकचा चैत्य व अजंठा लेणे क्रमांक ९ चे चैत्याशी जुळणारा आहे. त्याचा काल इ. स. पूर्व पहिल्या शतकाच्या अखेरीस किंवा इ. स. १ ल्या शतकातील पहिली दोन दशके असा आहे. वरील चैत्यगृहही त्या दरम्यान कोरले गेले असावे असे वाटते. या चैत्यगृहाजवळ चार लेणी आहेत. त्यातील एक बऱ्यापैकी विहार आहे. त्यास ओसरी, प्रवेश-द्वाराच्या दोन्ही बाजूस खिडक्या, आत मंडप व काही खोल्या आहेत. मागील भिंतीत एक स्तूप कोरलेला आहे. परंतु तो अपूर्ण आहे. या विहाराच्या बाजूच्या व समोरील डोंगरावरील दोन-तीन लेणी साधी आहेत.

**भीमाशंकर गट**

जुन्नर गावाच्या आग्नेयेस सुमारे २ कि.मी. अंतरावर मानमोडी डोंगराची रांग सुरू होते. पुण्याहून बसने जुन्नरला येताना गावात प्रवेश करण्यापूर्वी डावीकडील डोंगरात ही लेणी दिसू लागतात. गावात शिरण्यापूर्वी जकात नाके लागत. तेथून काही भाग कच्च्या रस्त्याने व पुढे लेण्यांच्या दिशेने पाऊलवाटेने वरती जावे लागते. पायथ्याशी महाराष्ट्र वनविभागाने सागाची झाडे लावली आहेत. मानमोडी डोंगर सुमारे ३ कि.मी. लांबीचा असून त्यात सुरुवातीस

V. P. Bhagwat

भीमाशंकर गट, मधल्या भागात अंबा-अंबिका गट व शेवटी भूत लेणी गट आहे. येथे पहिल्या गटात एकूण १७ लेणी आहेत. त्यातील लेणे क्रमांक २ हे चैत्यगृह असून बाकी सामान्य खोल्या आहेत.

**लेणे क्रमांक १**—हे चैत्यगृहाच्या दक्षिणेस असून त्यास दर्शनी भागात कलश, अष्टकोन, उपडा कलश अशा रचनेचे, मध्ये दोन स्तंभ व कडेस अर्धस्तंभ आहेत. याच्या मागे ओसरी असून मागील भिंतीत भिक्षूंच्या निवासासाठी तीन खोल्या कोरल्या आहेत. बाजूच्या चैत्याच्या स्तंभाशी याचे साम्य आहे. त्यावरून हे त्याच्याशी समकालीन असावे.

**लेणे क्रमांक २.**—या चैत्यास आपण दुरून पहातो, परंतु जवळ गेल्यावर त्याची भव्यता खूप जाणवते. त्याच्या दर्शनी भागाची उंची १२.२० मी., रुंदी ६.१० मी. इतकी असून, हे दोन भागांत विभागले आहे. वरील ओसरीत आधुनिक पायऱ्या चढून वर गेले असता दोन्ही बाजूस दोन स्तंभ व बाजूस अर्धस्तंभ आहेत. स्तंभास खाली कलश नसून ते दगडी बाकावर आधारित आहेत. बाकास आतील बाजूने पाठ टेकण्यास कक्षासने व बाहेरील बाजूस वेदिकापट्टी कोरली आहे.

चैत्याच्या वरील भागात अर्धगोलाकार असलेला अपूर्ण चैत्य गवाक्ष असून त्यास बाहेरील बाजूने पिंपळाच्या पानासारखा आकार दिलेला नाही. तसेच हा भाग नेहमीप्रमाणे आरपारही खोदला गेला नाही, त्यामुळे या संपूर्ण भागास पारिभाषिक शब्दात 'आंधळे चैत्य गवाक्ष' असे म्हणतात. याच्यापुढे लहानशी गच्ची आहे. परंतु हा सर्व भाग उंचावर असल्यामुळे तेथे जाता येत नाही.

चैत्यगृहाच्या आतील मंडप काटकोनात असून त्यास सपाट छत आहे. या छतावर व ओसरीतील छतावर मातीच्या गिलाव्यांचे अवशेष दिसतात. मागील भिंतीत उभ्या काटकोनात मागील भिंतीपासून वेगळा असलेला दगड आहे. त्यात स्तूप कोरावयाचा होता, परंतु यावर कालांतराने एक बसलेली ओबडधोबड स्त्री मूर्ती कोरली गेली. या स्तूपाच्या बाजूस दोन लहान टाकी दिसतात. त्याचे मागील भिंतीत असलेल्या चिरातून पाणी झिरपते व या खंदकात साठले जाते. या चिरामुळे व पाण्याच्या साठ्यामुळे बहुधा हे चैत्यगृह पूर्णपणे कोरण्याचे राहून गेले.

चैत्याच्या प्रांगणात उजव्या भिंतीवर व लेणे क्रमांक ३ च्या दरवाजावर एक खूपच खराब झालेला तीन ओळींचा शिलालेख आहे. त्यात दान देणाऱ्यांचे नाव नष्ट झाले आहे व पूर्णपणे अर्थ लागत नाही. जी अक्षरे वाचता येतात ती अशी :

**सिधं उपासकस नेगम** · · · ·
**समलसपुतत** · · · ·
· · · · · ·**पुत विरभूती** · · · ·

वरील चैत्यानंतरची बरीच लेणी साधी असून ती डोंगराच्या चढ-उतारावर जिथे जागा सोयीची वाटली अशा ठिकाणी कोरली गेली. यांतील एका पाण्याच्या कुंडास लेणे क्रमांक ५ दिला असून त्यावर एक ओळीचा सुस्पष्ट शिलालेख आहे. कुंड व्यवस्थित खोदले आहे. त्यावर झाकण लावण्यासाठी नाली खोदली होती व कपारीच्या आत सुमारे ६ मीटर खोदले गेले. वरच्या अंगास बरीच मोठी चौरस जागा गुळगुळीत करून त्यावर शिलालेख कोरला तो असा :

**शिवसमपुतस सिवभूतिणो देयधम पोढि.**

**शिवसमाचा पुत्र शिवभूति याने कुंड** (पोढि) दान दिले.

**लेणे क्रमांक** ७.—वरील कुंडापासून पुढील थोडचा अंतरावर हे एक अत्यंत सामान्य लेणे आहे. परंतु यातील कोरीव लेख ऐतिहासिक दृष्टीकोनातून महत्त्वाचा आहे. या लेण्याचा दर्शनी भाग तुटलेला आहे. मागील बाजूस लहानसा मंडप दिसतो तो ३.०० मी. रुंद, १.४८ मी. खोल व २.०४ मी. उंच असून त्याच्या तिन्ही भिंतीस खाली ३० से. मी. रुंदी व तितकीच उंची असलेला दगडी बाक कोरलेला आहे. लेण्याच्या डाव्या बाजूस एक बरेचसे बुजलेले पाण्याचे टाके आहे. बाकी यात कसलीही कलाकुसर नाही. डाव्या भिंतीवर तीन ओळींचा सुबक अक्षरातील शिलालेख आहे तो असा:—

(ओ) **महखतपस सामिनहपानस**

(अ) **मात्यस वछसगोतस अयमस**

(दे) **यधम च पेंपोचें ढि मटपो च पुणयय वसे ४६ कतो.**

**स्वैर अनुवाद :** महाक्षत्रप नहपान याचा मंत्री अयम, जो वत्स गोत्रातील होता, त्याने या मंडपास (मटप) व कुंडास (पोढि) वर्ष ४६ मध्ये पुण्यकर्मार्थ दान दिले.

संपूर्ण जुन्नरच्या लेण्यात तत्कालीन राजवंशाचे नाव दर्शविणारा हा एकुलता एक शिलालेख आहे. यातील 'वसे ४६' तज्ज्ञांनी शक वर्ष ठरविले असून तो इसवी सन १२४ असा होता (४६+७८=१२४). याचा राजकीय इतिहास थोडक्यात असा आहे:

इसवी सनाच्या पहिल्या शतकाच्या अखेरीस व दुसऱ्या शतकाच्या पहिल्या दोन-तीन दशकात सातवाहनाच्या पडत्या काळात क्षत्रपाचे वर्चस्व होते.

कोकणचा काही भाग, तसेच नाशिक, कार्ले, जुन्नर हा परिसर त्याच्याकडे होता. क्षत्रप हे उत्तरेकडील कुषाण राजाचे मांडलिक, किंवा गव्हर्नर, म्हणून राज्य करीत होते. पुढे कुषाणांची सत्ता झुगारून, दक्षिणेकडे गुजरात व पश्चिम महाराष्ट्राच्या काही भागावर ते स्वतंत्र राज्य करू लागले. वरील महाक्षत्रप नहपान याची मुलगी दक्षमित्रा हिचा नाशिक येथील एका लेण्यात व जावई ऋषभदत्त याचा नाशिक व कार्ले येथे कोरीव लेख आहे. पुढे बलाढ्य गौतमीपुत्र सातकर्णी याने इसवी सन १२४ च्या आसपास नहपानाचा पराभव केला असे नाशिकच्या लेणे क्रमांक ३ च्या लेण्यात गौतमीपुत्राची आई बलश्री हिने शिलालेखात म्हटले आहे. वरील ऐतिहासिक घटनामुळे क्रमांक ७ (भीमाशंकर गट) हे लेणे लहान असले तरी त्यातील शिलालेखामुळे महत्त्वाचे आहे. क्रमांक ८ पासून १७ पर्यंतची लेणी ही सामान्य खोल्या आहेत. त्यात कलाकुसरीचा अभाव आहे.

**अंबा-अंबिका गट**

भीमाशंकर गटातील शेवटच्या लेण्यापासून त्याच पाऊलवाटेने पुढे सुमारे अर्धा किलोमीटरवर अंबा-अंबिका गट कोरलेला असून, यात क्रमांक १८ ते ३४ इतक्या लेण्या आहेत. यात एक चैत्य व बाकीचे विहार व साध्या खोल्या आहेत. तसेच येथे एकूण १५ शिलालेख आहेत. क्रमांक १८ ते २० पर्यंतची लेणी खोलीवजा असून त्यात काही पाण्याची कुंडे आहेत.

**लेणे क्रमांक २१**—यास मध्ये चौरस मंडप असून उजव्या बाजूच्या भिंतीत दोन व डाव्या बाजूस तीन अशा एकूण पाच खोल्या आहेत. मागील भिंतीत खोल्या कोरल्या नाहीत. कारण या भागात ठिसूळ दगडांचा मोठा थर आला त्यामुळे तो पुढे खोदण्यास निरुपयोगी ठरला. ओसरीत प्रवेशद्वाराच्या उजव्या अंगास दोन ओळींचा खंडित शिलालेख असून त्यातील दान देणाऱ्याचे नाव नष्ट झाले आहे. लेख आहे तो असा :

**· · (ग) हपति पु (तानं) भातूणं दाण क**
**· · · · सच प (च) गभं देयधंमं**

**आशय :** एका गृहस्थाची मुले · · ·, जे भाऊ आहेत, त्यांनी या पाच खोल्या दान दिल्या.

**लेणे क्रमांक २२ ते २४**—या एक खोली किंवा साधे मंडप असलेल्या लेण्या आहेत. परिसरात पाण्याची कुंडे बरीच आहेत.

**लेणे क्रमांक २५**—स्तूप असलेले हे लहानसे लेणे असून याचा दर्शनी भाग तुटलेला व प्रांगणात पाण्याची कुंडे आहेत. आत मागील भिंतीपासून वेगळा

असलेला अखंड दगडात स्तूप असून त्याची छत्री छतातच कोरली आहे. स्तूपावर वेदिकापट्टी व वरती हर्मिका आहे. हर्मिकेचा वरील दंडाचा भाग तुटलेला आहे. स्तूप सुंदर कोरलेला असून त्याचे छत सपाट व लेण्याचा आलेख काटकोनात आहे. या स्तूपासहित लेण्याचा चैत्यमंदिरासारखा उपयोग करीत असत की नाही हे सांगणे कठिण आहे. अशाच प्रकारचे स्तूप भाजे (जि. पुणे), कान्हेरी (मुंबई), नाडसूर (जि. रायगड), आणि पितळखोरे (जि. औरंगाबाद) येथे आहेत. यातील पहिल्या दोन ठिकाणी असे स्तूप मृत भिक्षूंच्यां स्मरणार्थ कोरले जात होते असे त्यावरील शिलालेखावरून समजते. लेणे क्रमांक २५।। चा स्तूपही अशाच प्रकारचा असावा असे वाटते.

**लेणे क्रमांक २६**——अंबा-अंबिका गटातील हे चैत्यगृह थोडया वेगळ्या प्रकारचे आहे. याचे चैत्यगवाक्ष नेहमीप्रमाणे दर्शनी नसून दर्शनी स्तंभाच्या मागे ओसरीत आहे. तत्कालीन कारागीर किंवा सूत्रधार चैत्यगृहात कसे बदल किंवा प्रयोग करीत असावेत हे आपणास यावरून दिसते. चैत्याच्या दर्शनी भागामध्ये दोन भव्य उंच स्तंभ व कडेस अर्ध स्तंभ दिसतात. दर्शनी भागाची उंची सुमारे ६.७० मीटर आहे. स्तंभाचा आकार नेहमीप्रमाणेच म्हणजे चौरस निमुळत्या चौथऱ्यावर कलश, यातून निघालेला अष्टकोनी खांब, त्यावर उपडा कलश व पुन्हा उलटा चौथरा असा आहे. ओसरीच्या मागील भिंतीत खालच्या अर्ध्या भागात प्रवेशद्वार व वरती प्रमाणबद्ध आरपार कोरलेले चैत्यगवाक्ष दिसते. चैत्यगृहाच्या आतील गाभारा बराचसा अपूर्ण कोरला गेला; याचे कारण दोन्ही भिंतीत व छतावर सुमारे दोन मीटर रुंदीचा ठिसूळ दगडांचा थर गेला असून तो बराच झिजला आहे. त्यातून पाणी झिरपते. यामुळे मागील भिंतीत जो स्तूप कोरण्यास घेतला होता तोही अर्धवट सोडला गेला. स्तूपाची हर्मिका फक्त काही प्रमाणात व्यवस्थित कोरली गेली. या अपूर्ण स्तूपावरून तो डेरेदार कसा कोरला जातो याची कल्पना करता येते.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे या एका लेण्यात एकूण ११ कोरीव लेख आहेत. परंतु एकातही या चैत्यगृहाचे कोणी दान केले याचा निर्देश नाही. दरवाज्याच्या वरील आडव्या पट्टीवर, चैत्यगवाक्षावर त्याच्या दोन्ही बाजूस, आणि डाव्या व उजवीकडील भिंतीवर इत्यादी ठिकाणी हे शिलालेख आहेत. ते सर्व खडबडीत दगडांवर कोरल्यामुळे अक्षरे सुबक नाहीत. म्हणून त्यांचे शब्दशः वाचन देणे आवश्यक नाही. परंतु सर्वांचा सारांश थोडक्यात असा :

यातील एका लेखात या डोंगराचे नाव 'मानमुकड' (संस्कृत मानमुकुट) असे दिले असून आजही ते 'मानमोडी' या अपभ्रष्ट रूपात गेली दोन हजार वर्षे प्रचलित आहे हे विशेष. तसेच येथे निवास करणाऱ्या बुद्धभिक्षु-संघास

'गेध विहार' असे म्हटले आहे. आजूबाजूच्या गावातील अनेक व्यक्तींनी येथील संघास त्याच्या चरितार्थासाठी जमिनी किंवा त्यातून येणारे उत्पन्न दिले आहे. जमिनीचा उल्लेख करताना त्या कोणत्या दिशेस आहेत व काही वेळा करंजा, आंबा व जांभूळ या झाडांच्या खुणा त्या दिशेस किंवा जमिनीजवळ असल्याचा निर्देश केला आहे. जमिनीच्या परिमाणास 'निवर्तन' हा शब्द अनेक शिलालेखात आहे. ५, १०, १५, २०, २६ वगैरे निवर्तने जमिनी दिल्या गेल्याचा उल्लेख आहे. कालमानानुसार याचे परिमाण बदलत गेले त्यामुळे एक निवर्तन म्हणजे बहुधा ६०० चौरस हात भूभाग असावा. यावरून बुद्धभिक्षु-संघास लोकाश्रय फारच चांगल्या प्रकारे होता हे स्पष्ट होते. कित्येकांनी पैसे किंवा पैशाच्या ठेवी दिल्या. त्यास 'कार्षापण' हा शब्द दिला आहे. देणगी देणाऱ्यात कुटिर-उद्योग करणारे बुरूड (वासाकार), तांबट (कांस्यकार), सोनार (सुवर्णकार) वगैरेनी जमिनी व पैसे संघास दिल्याचा उल्लेख आहे. तसेच एक 'आदुथुमा' नावाचा शक किंवा पार्थियन, जो जुन्नरच्या परिसरात रहिवासी झाला होता, त्याने जमिनी दान दिल्याचा उल्लेख आहे. या सर्व लेखात समाविष्ट असणाऱ्या नोंदीवरून आपणास तत्कालीन सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक परिस्थितीची चांगली कल्पना येते. आज सार्वजनिक ठिकाणी आपण जाहिरातीचे फलक पाहतो तसा त्याकाळी या लेण्यांचा उपयोग केल्याचा दिसतो.

**लेणे क्रमांक २७ व २८**—वरील चैत्यगृहाच्या उजव्या बाजूस एकाला एक लागून हे कोरले आहेत. या दोन्हीस ओसरी व मागील बाजूस प्रत्येकी दोन खोल्या तसेच क्र. २८ ला समोर दोन स्तंभ आहेत. दोन्हीत समोरील भिंतीवर सुबक अक्षरात शिलालेख कोरले आहेत. लेणे क्र. २७ मधील तीन ओळींचा शिलालेख आहे तो असा :

**भारुकछकानं लंकुडियानं भातूणं**
**असमस पुताण**
**बुधमितस बुधरखितस च बिगभं देयधंमं**

**आशय :** भरुकच्छ (गुजरातमधील भडोच) येथील आससमाचे पुत्र बुद्धमित्र व बुद्धरक्षित या दोन बंधूनी लेण्यातील दोन खोल्या (बिगभं) दान दिल्या.

भडोच प्राचीनकाळी सोपारा व कल्याणसारखेच महत्त्वाचे व्यापारी बंदर होते. इतक्या दुरून आलेले हे दोन बंधू जुन्नरला लेणे कोरण्यास दान देतात हे विशेष होय. या लेखात पहिली व तिसरी ओळ सुबक मोठ्या अक्षरात आहे. मधली वडिलांचे नाव असलेली ओळ खूपच लहान आहे. लिपिकार हे नाव कोरण्याचे विसरला असेल; म्हणून ती नंतर कोरली असावी. हे बंधू बौद्धधर्मीय होते हे त्याच्या नावावरून निश्चित होते. 'लंकुडिय' कदाचित हा

एक पंथ असावा. लेणे क्रमांक २८ मधील शिलालेख दोन ओळींचा आहे. परंतु तो अपुरा वाटतो. तो असा :

**सयितिगहपतिपुतस गहपतिस सिवदासस**
**बितियिकाय च सहा परिवा . . .**

**आशय :** गृहपति सयिती याचा पुत्र गृहपति शिवदास, त्याची पत्नी आणि त्याचे सर्व नातेवाईक (यानी हे लेणे दान दिले.)

**लेणे क्रमांक २९**—याचे खूपच काम अर्धवट राहिले. स्तंभाची सुरुवात झाली होती, परंतु ते अपूर्ण राहिले. त्यावरून हे स्तंभ कसे कोरले जात याची पद्धति आपणास यावरून समजू शकते. याच्या बाहेरील भिंतीत भग्न अवस्थेत उठावात कोरलेल्या स्तूपांचे अवशेष दिसतात. त्याच्या वरच्या बाजूस सुबक अक्षरांतील परंतु बराचसा तुटलेला शिलालेख आहे. त्यातील आशय असा आहे : 'गणांचा आचार्य, सुलस जो तेविज (त्रिपिटीक–त्रिविद्या ?) पारंगत, पूजनीय, थेर, सन्माननीय आणि गणांचा आचार्य आणि याचा शिष्य थेर भयंत चेतिय . . . . आणि गृहपति . . . . त्याचा नातू नंदन . . . . यांनी हा स्तूप दान म्हणून दिला.

**लेणे क्रमांक ३०**—हे वरच्या मजल्यावर (लेणे क्रमांक २१ च्या वर) असून त्यात पाच खोल्या एका ओळीत कोरल्या आहेत. खोल्यांच्या समोर छोटी गच्ची असून त्याचा बराचसा भाग तुटलेला आहे. एका खोलीच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस दोन शिल्पे कोरली आहेत. डावीकडील मूर्ती जैनांचा क्षेत्रपाल व उजवीकडील जैन देवी चक्रेश्वरी असावी. चौथ्या खोलीतही भिंतीवर मूर्तिकाम आहे. त्यात आदिनाथ हा जैनांचा प्रथम तीर्थंकर, दुसरी मूर्ती नेमिनाथ हा बावीसावा तीर्थंकर आणि तिसरी मूर्ती जैनांची देवता अंबिका कोरली असून ती आंब्याच्या झाडाखाली बसलेली दाखविली आहे. अंबिका ही नेमिनाथाची शासनदेवी आहे. याच अंबिकेच्या शिल्पावरून या संपूर्ण गटाचे 'अंबा-अंबिका' हे नाव पडले असावे. या जैनधर्मीय मूर्ती बुद्धधर्मीय लेण्यात सुमारे इसवी सन ८ व्या ९ व्या शतकात कोरल्या असाव्यात. कारण याच काळात वेरूळ आणि महाराष्ट्रात इतर ठिकाणी जैनांच्या कलेचा प्रभाव जास्त होता.

**क्रमांक ३१ ते ३४**—ही लेणी डोंगराच्या वरच्या भागात कोरली असून ती अगदीच सामान्य व अपूर्ण आहेत.

**भूत लेणी गट**

अंबा-अंबिका गटातील शेवटच्या लेण्यापासून निघालेल्या पाऊलवाटेने पुढे गेले असता काही अंतरावर 'भूत लेणी गट' ही मानमोडी डोंगरातील शेवटची

लेणी लागतात. या गटात ३४ ते ४९ अशा क्रमांकाच्या लेण्या आहेत. यातील चार-पाच वगळता बाकीच्या अगदी सामान्य आहेत. क्रमांक ३४ ते ३७ या बहुतेक एक खोलीवजा अर्धवट कोरलेल्या आहेत. या परिसरात पाण्याची बरीच कुंडे आहेत. त्यातील एकावर या ' पोढी 'साठी दान दिल्याचा शिलालेख आहे.

**लेणे क्रमांक ३८**—या संपूर्ण लेणीत चौरस मंडप, त्याच्या डाव्या व मागील भिंतीत प्रत्येकी दोन खोल्या कोरल्या आहेत.

**लेण क्रमांक ३९**—हे सुद्धा अपूर्ण असले तरी याचा आकार थोडा मोठा आहे. प्रांगणात पाण्याचे कुंड, दर्शनी तीन स्तंभ व बाजूस दोन अर्धस्तंभ आहेत. तसेच ओसरीत दोन्ही बाजूस एक-एक खोली, आत चौरस मंडप, उजव्या भिंतीत तीन व डाव्या भिंतीत दोन अपूर्ण खोल्या कोरल्या आहेत.

**लेणे क्रमांक ४०**—या गटातील हे चैत्यगृह जुन्नरमधील सर्व लेण्यांत अत्यंत देखणे, सालंकृत दर्शनी भाग असलेले असून महाराष्ट्रात असे हे एकमेव आहे.

चैत्याच्या दर्शनी भागाची उंची सुमारे ११ मी. असून तो दोन भागात विभागला गेला आहे. पैकी खालील भागात रुंद दरवाजा, त्यावर तुटलेल्या गच्चीचा शिल्लक राहिलेला भाग, समोर पायऱ्या, प्रांगणात तिन्ही बाजूच्या भिंतीत बसण्यासाठी बाक, डाव्या बाजूस पाण्याची दोन कुंडे, वगैरे; प्रांगणात दगडात खोदलेले चौरस खड्डेही आहेत. यात कदाचित लाकडी खांब लावून मंडप उभारला असण्याची शक्यता आहे. वरील दर्शनी भागात शिल्पांनी सजविलेले व इतर नक्षीकाम असलेले, सुंदर चैत्यगवाक्ष आहे. अगदी वरच्या पट्टीत सात मोठ्या व त्याच्या वरील अंगास लहान चैत्य कमानी असून तशाच त्या दर्शनी भागाच्या दोन्ही बाजूच्या उभ्या पट्ट्यात कोरल्या आहेत. हा सर्व भाग मधल्या गवाक्षाच्या थोडासा पुढे घेतला आहे. चैत्यगवाक्ष भले मोठे असून त्याचा आकार पिंपळाच्या पानासारखा किंवा घोड्याच्या नालेसारखा आहे. बरीचशी कमान पूर्ण केली गेली परंतु डाव्या बाजूस ती थोडीशी अपुरी आहे व त्यात वर्तुळाच्या काही भागाची रेषा कोरल्याचे अद्यापही दिसते. आपण कंपासचा उपयोग वर्तुळ किंवा वर्तुळाचे इतर भाग काढण्यासाठी जसा करतो तसाच इथे दगडात वर्तुळाच्या रेषा प्रमाणशीर कोरून केला आहे. यावरून अशा प्रकारची नक्षी किंवा इतर कलाकुसर त्या काळी कशी करत असत याची आपणास कल्पना येईल.

कमानीच्या उजव्या कोपऱ्यात एक वृक्ष व त्यावर माळा कोरलेल्या आहेत. तो बोधिवृक्ष असून भक्तांनी (भिक्षूंनी) आणलेल्या माळा त्यास अर्पण केल्या

आहेत. वृक्षाचा खालील कठडा अपुरा राहिला, तसेच त्याच्या डावीकडे एक मनुष्याकृती अपुरी राहिलेली दिसते. ती पूर्ण झाली असती तर आकाशातील उडता किन्नर दिसला असता. तुळजालेणी-गटात अशा प्रकारचे शिल्प आपण पाहिले आहे.

चैत्य–कमानीच्या वरील निमुळत्या टोकाच्या दोन्ही बाजूस उठावदार कोरलेल्या पुरुषाकृती दिसतात. त्यातील उजव्या बाजूस नागराजाचे शिल्प असून त्याच्या डोक्यावर पाच फणा आहेत. डोक्यावर तुरेदार फेटा असून कानात कुंडले, बाहूत बाजूबंद व कमरेखाली सोगा सोडलेले धोतर आहे. त्याने डावा हात कंबरेवर ठेवलेला असून उजव्या उंचावलेल्या हातात चौरी धारण केली आहे. नागराजाच्या विरुद्ध बाजूस त्याच्यासारखेच मानवसदृश शिल्प असून ते गरुडाचे आहे. त्याच्या खांद्याच्या दोन्ही बाजूस पंख असून तुरेदार फेट्याच्या वर चोंचदार पक्षाचे तोंड कोरले आहे. याचाही डावा हात कमरेवर असून उजव्या उंचावलेल्या हातात चौरी धारण केली आहे. याचे बाकी सर्व वस्त्रालंकार नागराजासारखेच आहेत. हा गरुड बौद्ध जातक कथातील सुपर्ण असावा. आपणास माहीतच आहे की, गरुड आणि सर्प यांचे जन्मजात वैर असते. परंतु इथे चैत्यासमोर दोघेही आपले वैर विसरून भगवान बुद्धाच्या दारी सेवा करण्यास चौरी घेऊन राखण करीत आहेत. शिल्पकाराचे आणि चैत्यास दान देणाऱ्या दात्याचे या कल्पकतेबद्दल कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

या नागराज आणि गरुड शिल्पांना स्थानिक लोक भुते समजतात. तसेच त्यांच्या बाजूस असलेल्या स्तूपांना लिंग समजतात. यावरून या लेण्यास ‘ भूत-लेणी ’ किंवा ‘ भूतलिंग ’ असे नाव पडले.

कमानीच्या आतील अर्धगोलास मण्याच्या झालरी असून त्यात कमळाच्या सात पाकळ्या उठावदार कोरलेल्या आहेत. प्रत्येक पाकळीच्या वरील दलात पूर्ण कमळे दाखविली असून मोठ्या पाकळ्यात उत्कृष्ट शिल्पे कोरली आहेत. मधल्या पाकळीत समभंगस्थानात गजलक्ष्मी उभी असून तिचा डावा हात कमरे-वर, उजवा उंचावलेला, अभय मुद्रेत आहे. कानात कुंडले आणि इतर अलंकार असून ती साडी नेसली आहे. गजलक्ष्मीच्या दोन्ही बाजूंकडील पाकळ्यांत कमल-पुष्पावर पाय आखडून उभे असलेले दोन हत्ती असून त्यांच्या सोंडेत लक्ष्मीवर जलवृष्टी करण्यासाठी कुंभ दाखविले आहेत. हत्तीच्या वर आणि समोर पाना-सहित कमळाची कळी दाखविली आहे. दोन्ही हत्तींच्या पाठीमागील दोन-दोन पाकळ्यात एक पुरुष व एक स्त्री अशी उभी असलेली युगुले अतिभंगमुद्रेत

दिसतात. ते नृत्य करीत असून त्यांचे दोन्ही हात कोपरापासून डोक्यावर उंचावलेत. कदाचित् ही नमस्कार मुद्रा असेल. त्यांचे वस्त्रालंकार लक्ष्मी व वरील नागराज-गरुडासारखेच आहेत. या युगुलांच्या बाजूस ही कमलपुष्पे व पानासहित कमळकळी दाखविली आहे. या सर्व शिल्पांच्या खाली पुन्हा एक अर्धवर्तुळ असून त्याचा आकार उमलत्या कळीसारखा किंवा घडीचा पंखा उघडल्यावर दिसतो तसा दाखविला आहे. या शिल्पांतील कमळाची फुले, पाने, कळ्या, हत्ती वगैरे पाहून कमळाने भरलेला तलाव आहे असे वाटते. याच्या खाली चंद्रकोराच्या आकाराची सपाट पट्टी असून त्यात एका ओळीत अर्धवर्तुळाकार शिलालेख आहे. तो असा :

**यवनस चंदानं देयधम गभदा (र)**

यवन (ग्रीक) चंद्र याने गर्भद्वार दान दिले.

कुमारस्वामी यांच्या मते ही गजलक्ष्मी गौतमबुद्धाची आई मायादेवी असावी. बौद्ध शिल्प व ग्रंथातील निर्देश यावरून ती कल्पना अशक्य नसावी असे वाटते.

गजलक्ष्मीची शिल्पे उत्तर भारतात बौद्ध शिल्पात सांची, भारहूत वगैरे ठिकाणी अनेक आहेत. महाराष्ट्रातील लेण्यात मात्र ती फारच थोडी आहेत. सर्वसाधारण कालानुक्रमाने पितळखोरे (जि. औरंगाबाद) येथील विहारात एक व पश्चिम महाराष्ट्रातील नाडसूर (जि. रायगड) येथील विहार क्रमांक ८ व १६ मध्ये अशी तीन गजलक्ष्मीची शिल्पे आहेत.

चैत्यगृहाच्या आतील भाग दुर्दैवाने बराचसा अपुरा राहिला आहे. याचा आलेख गजपृष्ठाकृती किंवा चापाकार असून छत अर्धगोलाकार आहे. उजव्या बाजूस चार अष्टकोनी खांब असून ते लेण्याच्या आकाराशी थोडेसे बोजड वाटतात. डाव्या बाजूच्या भिंतीत खांबाची फक्त सुरुवात केलेली दिसते. या दोन्ही बाजू व्यवस्थित पाहिल्यास अशा प्रकारचे खांब कसे कोरले जात याची कल्पना येते. पाठीमागे अर्धगोल भिंतीपासून अलग असा स्तूप कोरला आहे. त्यावर हर्मिका नाही. परंतु दंडासहित छत्र बसविण्यासाठी चौरस खोबणी कोरली आहे. या चैत्यगृहाच्या दर्शनी भागावरील शिल्पांचे कारले व बेडसे (जि. पुणे) येथील चैत्यातील शिल्पाशी लक्षणीय साम्य आहे. तज्ज्ञांनी याचा काल इ. स. च्या पहिल्या शतकाचा मध्य धरला आहे. या चैत्यगृहाचाही काल त्याच्या आसपास असावा.

**लेणे क्रमांक ४१ ते ४७**—ही लेणी म्हणजे वरच्या मजल्यावर (क्र. ३९ च्या वर) एकास एक लागून अशा खोल्या आहेत. त्यांच्या समोरची गच्ची थोडीफार

तुटली आहे. डावीकडील चार खोल्या साध्या आहेत. परंतु उजवीकडील प्रत्येकीच्या प्रवेशद्वारावर चैत्यकमानी कोरल्या आहेत. त्याच्या बाजूने स्तूप, वेदिकापट्टी व लहान चैत्य-कमानी दिसतात. मोठ्या चैत्य-कमानींच्या आत नक्षीकाम केले असून त्यांत एकात एक गुंफलेली फुले, नंदीपद, त्रिरत्न, श्रीवत्स आणि धर्मचक्र कोरले होते. त्याचे थोडेसे अवशेष दिसतात. वरील प्रकारची नक्षी आपण तुळजालेणीतील विहारातही पाहिली आहे. पितळखोरे, नाशिक, बेडसे व नाडसूर इत्यादी ठिकाणी अशा प्रकारची नक्षी थोड्याफार फरकाने कोरल्याचे दिसून येते.

**लेणे क्रमांक ४८-४९**––चैत्याच्या वरील डोंगरात असून ती अपूर्ण आहेत.

**शिवनेरी-पूर्व-गट**

शिवनेरी किल्ल्याच्या पूर्व, दक्षिण आणि पश्चिम बाजूच्या कडेकपारीत सुमारे सत्तर-ऐंशी लेणी आहेत. यातील बरीच सामान्य असली तरी काही महत्त्वाची आहेत. त्यांचे पूर्व, दक्षिण आणि पश्चिम या क्रमाने वर्णन करू.

जुन्नर गावातून, किंवा नवीन एस.टी. स्टँडकडून, डांबरी रस्त्याने आपण किल्ल्याकडे जाऊ लागतो तेव्हा त्या लेण्या समोरच दिसतात. या गटात सुमारे ५३ लेणी व पाण्याची अनेक कुंडे आहेत. किल्ल्याच्या पूर्वेस, थोडेसे डाव्या बाजूस, पायथ्याशी महाराष्ट्र शासनाच्या वनविभागाने सागाची झाडे लावली आहेत. तेथून हा क्रम सुरू होतो. यातील वरच्या अंगास कपारीतील काही लेण्यांचे मार्ग पूर्णत: तुटलेले आहेत; त्यामुळे तेथे जाणे अवघड आहे.

**लेणे क्रमांक २**––हे चैत्यगृह असून आतापर्यंत पाहिला त्यापेक्षा याचा प्रकार वेगळा आहे. याच्या दर्शनीभागी नेहमीप्रमाणे कलश असलेले स्तंभ असून मागे अरुंद ओसरी आहे. याचा दरवाजा बराच रुंद असून दाराची चौकट बसविण्यास वरच्या आणि खालील कोपऱ्यात खूप मोठे चौरस खड्डे आहेत. आत चौरस मंडप असून मध्यभागी एक तुटलेला स्तूप आहे. वरील छत सपाट असून बाकी यात कसलीच कलाकुसर नाही. गरजेनुसार येणारा साधपणा यात दिसतो.

**लेणे क्रमांक ४**––क्रमांक ३ ते ५ या एकाला एक लागून असलेल्या चौरस खोल्या असून त्याच्या उजव्या अंगास मोठे कुंड आहे. मधल्या क्रमांक ४ च्या ओसरीत दगडी बाक असून त्याच्या वरील भिंतीत दोन ओळींचा शिलालेख असून दोन्ही ओळीतील पहिली अक्षरे तुटली आहेत. त्यामुळे पूर्ण अर्थ लागत नाही. परंतु अक्षरे सुबक आहेत.

. . . . . . . . . . . . . . . **थ भूतिनकस**
. . . . . . . . . . . . . . . . **पोढि चा देयधम.**

**सारांश :** भूतेनक नावाच्या गृहस्थानें हे कुंड (पोढि) आणि लेणे दान दिले.

**क्रमांक ६ ते १५.**——या सामान्य एक खोलीवजा लेण्या असून त्यास बाहेर ओसरी आहे.

**लेणे क्रमांक १६–१७**——हे दोन मजली लेणे असून खालच्या मजल्यास छोटेसे अंगण आहे. मधल्या रुंद दरवाजाच्या दोन्ही बाजूस खिडक्या असून आत चौरस मंडप, मागील भिंतीत चार व बाजूच्या भिंतीत प्रत्येकी तीन खोल्या कोरल्या आहेत. त्यातील काही अपूर्ण आहेत. उजवीकडील कोपऱ्यातून वरच्या मजल्यास जाण्यास दगडात कोरलेल्या पायऱ्या लागतात. वरती छोटासा मंडप असून दर्शनी उघडा परंतु लहानसा कठडा जमिनीवर कोरलेला आहे. येथून मागे वळून पाहिले असता संपूर्ण जुन्नर गाव, आजुबाजूच्या टेकड्या, गर्द झाडीतून वाहणारा कुकडीचा प्रवाह, नवीन एस.टी. स्टँड वगैरेंचे विहंगम दृश्य दिसते व इतका वेळ केलेल्या पायपिटीचा थकवा नाहीसा होतो.

या लेणीच्या डाव्या भिंतीवर एका लांबलचक ओळीत व सुबक अक्षरात शिलालेख कोरला आहे तो असा :

**मुधकियस मलस गोलिकियस आनदस बेण जणान देयधम उपठाण**

**सारांश :** या उपस्थानासाठी मुधकिय मल (मूर्धकीय मल्ल) आणि गोलिकीय आनंद (गौल्लिकीय आनंद) या दोन माणसांनी दान दिले.

उपस्थान म्हणजे बैठकीची खोली असाही होईल. कुस्ती खेळणारा मल्ल व गवळी यांनी लेण्यास दान द्यावे हे विशेष होय.

**लेणे क्रमांक** २१-२२——येथे दोन एकाला एक लागून मोठे मंडप असून आत दोन्ही खोल्यांच्याच चौरस आकाराचे खड्डे कोरले आहेत. त्याचा उपयोग धान्य किंवा दारुगोळ्याची कोठारे असा केला असावा. या परिसरातील भिंतीत हनुमान, दुर्गा वगैरे लहानशी शिल्पे कोरली आहेत. शिल्पशैलीवरून ती मध्ययुगीन कालातील वाटतात. या लेण्याच्या जवळून किल्ल्यावर जाण्यासाठी दगडी पायऱ्या कोरल्या आहेत. त्यास 'चोरवाट' असे म्हणतात.

**लेणे क्रमांक** २५——हा बराच मोठा काटकोनी मंडप किंवा सभागृह असून आतील तिन्ही भिंतीत प्रमाणशीर दगडी बाक कोरला आहे. मागील बाकात पुढे पीठासारखी जागा वाढवली आहे. येथे कदाचित् बौध्द आचार्य बसून प्रवचन करीत असावेत.

**लेणे क्रमांक २७**——हे लेणे वरेच मोठे असून यास प्रशस्त अंगण आहे. परंतु मध्ययुगीन कालात याचे देवालयात रूपांतर केले गेले. दर्शनी घडीव दगडाची भिंत बांधून डावीकडे यादवकालीन हेमाडपंती पद्धतीची कलाकुसर असलेली दगडी चौकट बसवली. आतमध्ये काटकोनात मोटा मंडप असून डाव्या भिंतीत दोन व मागील भिंतीत तीन खोल्या काढल्या आहेत. मागील भिंतीत उजव्या कोपऱ्यात आणखी एक मोठी खोली खोदली आहे. तिचा उपयोग कदाचित् भांडार ठेवण्यास केला असावा. ओसरीत उजव्या भिंतीवर नष्ट केला गेलेला एक शिलालेख होता. त्यातील ' यवन ' ही पहिली तीन अक्षरे वाचता येतात.

**लेणे क्रमांक ३५-३६**——हे एक लहानसेच परंतु शिलालेखामुळे अत्यंत महत्त्वाचे लेणे आहे. यास लागूनच एका ओळीत क्रमांक ३७ ते ४० एक-खोलीवजा लेण्या कोरल्या आहेत. क्रमांक ३६ ला छोटीशी ओसरी असून डाव्या बाजूस उठावदार स्तूप कोरला आहे. त्याचा काही भाग तुटलेला असून खालच्या बाजूस पाण्याचे कुंड आहे. आतमध्ये लहानशी चौरस खोली असून तिच्या उजव्या भिंतीत दगडी बाक कोरला आहे. ओसरीत दरवाज्याच्या डाव्या बाजूस भिंतीवर पाच ओळीत सुबक अक्षरातील लेख कोरलेला असून त्यातील काही शब्द तुटले आहेत. तरीही त्यात बराचसा महत्त्वाचा मजकूर राहिला आहे.

**१ अपगुरियान सवगिरियासस पुतस पतीबधकस गिरिभूतिस सखुयारुस लेण पोढी च**

**२ (दे) यधमं एतस च लेणस पोढिय च नकरे च भिखूनीउपसयो (य) स धंमुतरियान अखयनिवि क (का)**

**३ (हा) पनानि....एतो लोणस चीवरिका काहाप को (ण) सोदस पोढिय चीव**

**४ (ए मत) च विसहसता पयोगा तोरिवढी सहसवढ धण उपाय्यस**

**५ ........ यो उपसयो नगरे गिरिभूतिस बितियीकायि (य) सिवपा[लि]तनिका[य].**

**सारांश :** अपगुरिय, सवगिरिय याचा पुत्र पतिबंधक गिरिभूति याने हे लेणे व बाजूचे कुंड दान दिले. तसेच या लेण्यास व कुंडास आणि गावातील धर्मोत्तरीयांच्या भिक्षुणी-संघास कार्षापणांची एक कायम ठेव दिली.

....गिरिभूतिची पत्नी सिवपालितनिका, जिचा भिक्षुणी-संघ गावात आहे.

गावातील भिक्षुणी-संघाचा उल्लेख महत्त्वाचा आहे. त्याकाळी इमारती बहुतेक विटा व लाकडात बांधीत असत. जुन्नर गावात जुन्या एस.टी. स्टँडच्या

मागे माळीवाडा, आगर भागात तत्कालीन विटांचे अवशेष दिसतात. या भिक्षुणी-संघाची नक्की इमारत कोठे होती हे सांगणे कठीण आहे. परंतु उत्खनन झाले तर काही पुरावा मिळण्याची शक्यता आहे. दुसरा महत्त्वाचा उल्लेख या शिलालेखात धर्मोत्तरीय संघाचा आहे. जुन्नर गावात धर्मोत्तरीय संघाचे भिक्षू होते असे दिसते. पूर्वीच्या 'थेरवाद' संघात वाद निर्माण झाले. त्यातील धर्मोत्तर नावाच्या भिक्षूने फुटून नवीन संघ निर्माण केला, त्यास 'धर्मोत्तरीय' असे म्हणतात. ही घटना इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात घडली. तिसरा महत्त्वाचा उल्लेख या भिक्षूणी-संघाची मुख्य स्त्री होती व तिच्या नावावरून (सिवपालितनिका) तो संघ ओळखला जात असे. अशा प्रकारे लेणे साधे असले तरी त्यावर असलेल्या शिलालेखामुळे आपणास तत्कालीन सामाजिक, धार्मिक वगैरे बरीच महत्त्वाची माहिती मिळते.

**लेणे क्रमांक ४२**––हे या गटातील मोठे लेणे असून यास स्थानिक लोक 'बारा गडद' किंवा 'बारा कोठडी' असे म्हणतात. कारण आतमध्ये तीन भितींत प्रत्येकी चार अशा एकूण बारा खोल्या कोरल्या आहेत.

**लेणे क्रमांक ४७**––हा एक लहानसा विहार असून प्रवेशाजवळ ओसरीत दगडी बाक कोरला असून तो उजव्या हाताच्या लेणे क्रमांक ४८ या चैत्यगृहाच्या ओसरीशी सामाईक आहे. विहाराच्या आत चौरस मंडप आणि डाव्या भितीत तीन व मागील भितीत दोन अशा पाच खोल्या कोरल्या आहेत. मागील दोन खोल्यांच्या मधील भितीवर कोनाड्यात उठावात एक स्तूप कोरलेला असून त्यावर हर्मिका व छत आहे. स्तूपावाजूच्या भिंती व छतावर मातीचा गिलावा लावून त्यावर चित्रे काढली होती. छतावर चौरसात वर्तुळे व कमळाची फुले दिसतात.

**लेणे क्रमांक ४८**––हे चैत्यगृह आहे. त्याचे छत दर्शनी भागाच्या बरेच पुढे असून यावर मातीचा गिलावा व रंगकाम केल्याचे दिसते. प्रवेशाजवळ पायऱ्या आणि त्याला लागूनच लांबलचक दगडी बाक कोरला आहे. प्रवेशद्वार प्रशस्त असून त्याच्या दोन्ही बाजूस खिडक्या आहेत. आतमध्ये काटकोनात भव्य मंडप असून समोर दोन कलश, अष्टकोन, उपडा कलश अशा रचनेचे स्तंभ व बाजूस अर्धस्तंभ दिसतात. सपाट छतावर अद्यापही भरपूर प्रमाणात रंगकाम केलेले टिकून आहे. मातीच्या गिलाव्यावर सफेद रंग देऊन त्यात पिवळ्या व गेरू रंगात कमळ व वर्तुळे काढली आहेत. मंडपाच्या मागे मागील भितीपासून वेगळा असलेला स्तूप फारच सुंदर कोरला आहे. त्यास वेदिकापट्टी, हर्मिका असून त्याची सुबक छत्री दगडी छतात कोरली आहे. सपाट छत, काटकोनात मंडप व स्तूपाची छत्री छतात कोरणे, तसेच याचे स्तंभ आत आडव्या ओळीत कोरणे, हे या चैत्यगृहाचे खास वैशिष्टच आहे.

बाहेरील उजव्या खिडकीजवळच्या भिंतीवर तीन ओळीत सुबक अक्षरांतील शिलालेख आहे तो असा :

**वीरसेणकस गहपतिपमुघस**

**धंमनिगमस देयधंमं चेतियघरो**

**नियुतो सवलोकहितसुखाय.**

गृहपतिप्रमुख आणि व्यापारी वीरसेन याने या चैत्यगृहासाठी दान दिले आणि ते सर्व लोकांच्या कल्याणासाठी व सुखासाठी अर्पण केले.

**लेणे क्रमांक ४९ ते ५३**—सामान्य प्रकारची लेणी असून तेथील दोन कुंडांवर शिलालेख आहेत त्यातील पहिला असा :

**यवनस इरिलस गतान देयधमं बे पोढियो.**

गता देशाचा यवन (ग्रीक) इरिल याने येथील दोन कुंडे दान दिली.

दुसऱ्या कुंडावर खालीलप्रमाणे दोन ओळीत शिलालेख आहे. त्यातील शेवटचा भाग नष्ट झालेला दिसतो :

**१ अपगुरियान सवगिरियासपुतस पतिबधकस (गि)रिभूतिस,**

**(सह)भयाय सिवपालनिकाय**

**२ देयधम पोढि लेण च एतस अखयनिवि . . . . . .**

उपगुरिय सवगिरि याचा पुत्र पतिवधक, गिरिभूति व त्याची पत्नी शिवपालनिका यांनी लेणे व कुंडासाठी कायम निधी दिला.

हे दानकर्ते आणि अगोदर पाहिलेल्या लेणे क्रमांक ३६ यातील दानकर्ते हे एकच कुटुंब आहे.

**शिवनेरी दक्षिण गट**

शिवनेरीच्या दक्षिणेकडील लेणीसमूहाकडे जाण्यास किल्ल्यातील पाचव्या 'शिवाई'च्या दरवाज्यातून उजवीकडे वळावे लागते. शिवाई मंदिराच्या खालील पाऊल वाटेने गेले असता लेणी दिसतात. उजवीकडे तटाची भिंत व बुरूज आहेत. या दक्षिणेकडील परिसरात वीस-पंचवीस लेणी असून त्यातील पुढील तीन फक्त महत्त्वाची आहेत.

**लेणे क्रमांक ५५**——यास लांबट ओसरीअसून मागे चौरस खोली व त्याच्यामागे उजवीकडे आणखी एक खोली व त्यात दगडी बाक कोरला आहे. प्रवेशद्वाराच्या डाव्या भिंतीवर वरील अंगास दोन ओळीत शिलालेख आहे तो असा :

**उगाहउपासकस पुतस**

**इसिपालितस सपुतकस दानं**

उपासक उगाहचा पुत्र इसिपालित (ऋषिपालित) आणि त्याची मुले यांनी दान दिले.

**लेणे क्रमांक ५७**——हे एक लहानसे लेणे आहे, परंतु त्यातील शिलालेख मजेशीर आहे. या लेण्यास छोटीशी ओसरी असून डावीकडे दगडी बाक कोरला आहे. आत चौरस मंडप असून त्याच्या तिन्ही बाजूस दगडी बाक आहे. बाहेर उजवीकडे प्रशस्त पाण्याचे कुंडही कोरले आहे. याच्या दर्शनी डावीकडे एक अत्यंत रेखीव, सुबक चार ओळींचा शिलालेख आहे तो असा :

**यवणस**

**चिटस गतानं**

**भोजण मटपो**

**देयधम सघे**

**अनुवाद :** गता देशाचा यवन (ग्रीक) चित (चैत्र) याने संघास हा भोजनमंडप दान दिला.

या शिलालेखात दोन-तीन महत्त्वाच्या गोष्टी आहेत. या लेण्यांच्या आलेखात दर्शविलेले चौरस मंडप, दगडी बाक व बाहेर पाण्याचे कुंड वगैरे या प्रकारच्या लेण्या भोजनमंडप म्हणून उपयोगात आणल्याचे दर्शवितात. भिक्षुसंघास जमिनी, त्यातील उत्पन्न व पैशाच्या ठेवी यांचे उल्लेख आपण अनेक लेखांत पाहिले. ज्यावेळी संघ मोठ्या प्रमाणात असेल त्यावेळी इतर ऐहिक गोष्टींची गरज भासणारच; सर्वांचा भिक्षेवर निर्वाह होईल असे नाही. त्यामुळे गरजेनुसार लेणी कोरली असावीत. या प्रकारची लेणी जुन्नरमध्ये अनेक आहेत.

**लेणे क्रमांक ५९**——हे एक जोड लेणे असून त्याच्या डाव्या बाजूस चैत्यगृह व उजवीकडे भिक्षू निवासासाठी मोठी खोली कोरली आहे. हा चैत्याचा नवीन प्रकार वाटतो. चैत्याला दर्शनी स्तंभ होते ते तुटले आहेत. परंतु उजव्या भिंतीत त्यांचे अर्धस्तंभात अवशेष आहेत. याच्यामागे छोटीशी ओसरी असून प्रवेश द्वारातून आत गेल्यावर काटकोन मंडप दिसतो. याचे छत सपाट आहे. तसेच

मागील भिंतीपासून अलग स्तूप अखंड दगडात कोरला आहे. पण त्यावर हर्मिका व छत्र नाही. बहुतेक हे दोन्ही भाग विटांत आणि लाकडांत केले असण्याची शक्यता आहे. या मंडपाच्या उजव्या भिंतीत दार असून त्यातून बाजूच्या खोलीत मोठा मंडप व त्याच्या मागील भिंतीत दगडी बाक कोरला आहे.

चैत्य दरवाज्याच्या डाव्या बाजूस वरील अंगास एक ओळीचा शिलालेख आहे तो असा :

**उगाहपुतस इसिपालितस सपरिवारस चेतियघरो दानं**

**अनुवाद :** उगाहचा पुत्र इसिपालित (ऋषिपालित) आणि त्याचे कुटुंब यांनी हे चैत्यगृह दान दिले.

या चैत्यास दान देणारे व वरील लेणे क्रमांक ५५ मधील दान देणारे एकच कुटुंब असावे.

वरील चैत्यगृहाच्या नंतर एक लेणे असून तेथे तटाच्या भिंती व बुरूज संपून पुढील मार्ग बंद आहे. बुरूजावरून डोकावून पाहिले असता प्रथम पाहिलेल्या शिवनेरी पूर्वगटातील लेणी दिसतात.

### शिवनेरी पश्चिम गट

या गटास जाण्यास सोयीचा मार्ग किल्ल्याच्या उत्तरेकडील पायथ्याने आहे. जुन्नर गावातून निरगुडे गावी जाण्यास मार्ग आहे. किल्ल्याचे उत्तरेकडील टोक पार केल्यावर पश्चिमेच्या बाजूस महाराष्ट्र शासनाच्या वनविभागाने सागाची झाडे लावली आहेत; तेथून पाऊलवाटेने वरती जावे लागते. वाट बिकट आहे. यात सहा लेणी व बरीच पाण्याची कुंडे आहेत. त्यातील दोन पाहण्यासारखी आहेत.

**लेणे क्रमांक ७६**—हे लेणे या गटात मोठे आणि लक्षणीय आहे. यास लांबट ओसरी असून छतावर चार उतरत्या पायऱ्यांची चौकट असून त्यास प्रत्येकी खाली एक छिद्र आहे. जमिनीवर खांबाच्या पायाचे अवशेष नाहीत. यावरून येथे घडीव दगडांचे स्तंभ उभारले असावेत. ओसरीच्या छतावर रंगकामाचे अवशेष दिसतात. प्रवेशद्वार रुंद असून दोन्ही बाजूस खिडकी आहे. भिंतीवर ठराविक अंतरावर चौरस खोबणी कोरल्या आहेत. कदाचित त्यांचा दिवे ठेवण्यासाठी उपयोग होत असावा. लेण्याच्या आत प्रशस्त मंडप असून त्याच्या सर्व भिंतीस दगडी बाक कोरलेले आहेत. संपूर्ण छत सुबकरितीने चितारलेले होते आणि त्याचा बराच मोठा भाग आजही अस्तित्वात आहे. प्रथम छतास मातीचा गिलावा लावून त्यावर पांढरा चुना लावला; त्यावर गेरूच्या रंगात चौकोन आखून मध्ये कमळ व वर्तुळे रंगविलीत. शिवनेरीपूर्व, गणेशलेणी गटात

अशाच प्रकारचे छत रंगविले आहे. त्यावरून या बऱ्याच लेण्या समकालीन वाटतात.

**लेणे क्रमांक ८१**—हे शेवटच्या टोकास म्हणजे दक्षिणेस असून त्यास चौरस मंडप, मागील भिंतीत दोन व बाजूच्या भिंतीत प्रत्येकी एक खोली आहे. यातील दोन खोल्यांत दगडी बाक आहे. लेणीच्या डाव्या हातास पाण्याचे कुंड आहे.

**नाणेघाट**

जुन्नरच्या वायव्येस २७.२ कि.मी., पुण्यापासून ११५.२ कि.मी. अंतरावर नाणेघाट असून येथे येण्यास जुन्नरहून एस.टी. बसने चावंड-आपटाळा मार्गाने घाटघरपर्यंत येता येते. वाटेत सुरुवातीस वर्णन केलेल्या डोंगरांच्या रांगा, चावंडचा किल्ला, उजवीकडे दूरवर हडसर किल्ला, निमगिरी डोंगर वगैरे प्रदेश लागतो. घाटघरला लागूनच जीवधन किल्ला आहे. हा सर्व प्रदेश सृष्टीसौंदर्याने नटलेला आहे. घाटघरच्या उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत बरेच घाट आहेत. उदाहरणार्थ : माळशेज, नाणेघाट, गुणाघाट, दाऱ्याघाट, अंबोलीघाट, पिंपरी घाट वगैरे. या घाटांच्या माळेमुळे 'घाटांचे घर' हे घाटघरचे नाव सार्थ वाटते.

घाटघरपासून पश्चिमेस चांगल्या वाटेने सुमारे ४ कि.मी. गेल्यानंतर नाणेघाट लागतो. जाताना वाटेत डावीकडे जीवधन किल्ल्याचा काही भाग व त्या समोर मनुष्याकृती शिल्पासारखा दिसणारा दोनशे ते अडीचशे फूट उंचीचा सुळका दिसतो. पुढे गेल्यावर एक उंच टेकाड दिसते त्यास 'नानाचा अंगठा' असे म्हणतात. हे नाणेघाटाचे अत्युच्च टोक आहे. वरती तुफान वाऱ्याचा झोत सतत असतो. शिखरावर उभे राहून पाहिले असता उत्तरेकडील कळसूबाईच्या डोंगरापासून ते दक्षिणेकडील भीमाशंकरपर्यंतचा प्रदेश दिसतो.

नानाच्या अंगठ्यास जाण्यापूर्वी डावीकडे काळ्या पाषाणाची दरी दिसते. तो गुणाघाट असून येथे काही दशकापूर्वी 'रोप-वे-रेल्वे मार्ग' करण्याचे काम हाती घेतले होते, ते रद्द झाले. परंतु या कामासाठी त्यावेळी बांधलेल्या इमारतींचे पडलेले अवशेष दिसतात. याच अवशेषात उजव्या हातास एक भला मोठा दगडी रांजण आहे. त्यात पूर्वी जकातीचे पैसे टाकले जात असे सांगितले जाते. या दगडी रांजणाच्या विरुद्ध दिशेस किंवा रस्त्याच्या डाव्या बाजूच्या डोंगरात अनेक पाण्याची कुंडे व काही अपूर्ण लेणी आहेत. एकात मध्ययुगीन गणेश व लक्ष्मीचे शिल्प आहे.

रस्त्याने तसेच पुढे गेले असता दोन डोंगरांच्या मधली घळ दिसते. तो हाच प्राचीन काळी कोकण आणि देश यांना जोडणारा मुख्य दुवा, म्हणजेच नाणेघाट. येथून प्राचीनकाळी व्यापारी, सार्थवाह जात-येत असत. या घळीतून किंवा

खिडीतून पुढे गेल्यावर काही दगडांत कोरलेल्या, परंतु बऱ्याच ओबडधोबड, घडीव, दगडाच्या पायऱ्या लागतात. पायऱ्या सारख्या उंचीच्या नाहीत. त्यामुळे उतरण्यास त्रासाचे वाटते. परंतु समोर धूसर क्षितिजापर्यंत पसरलेल्या तळ कोकणचे मनोवेधक दृश्य दिसते. यात शीण निघून जातो. पुढे गेल्यावर डावीकडील कपारीत लोखंडी कठडा व त्याच्या मागे एक लेणे दिसते. हेच ते महाराष्ट्राच्या इतिहासास ललामभूत असणारे सातवाहन राजवंशातील राणी नागनिकेने कोरलेले शिल्प व लेख असलेले लेणे.

आतील मंडप किंवा सभागृह ८.७२ चौरस मीटर असून २.४० उंच आहे. याच्या तिन्ही भितींत खालच्या अंगास दगडी बाक कोरलेला असून तो बराच तुटला आहे. डाव्या अन् उजव्या भिंतीवर सुबक अक्षरांत कोरलेले प्रचंड शिलालेख आहेत. यातील बराचसा भाग तुटलेला आहे. त्यामुळे यातील महत्त्वाच्या ऐतिहासिक बाबींचा तपशील लागत नाही. तरीही आहे त्या स्थितीतसुद्धा त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. तितकेच महत्त्वाचे म्हणजे मागील भिंतीत दगडी बाकावर भिंतीत सातवाहन राजवंश कुटुंबातील आठ व्यक्तींची शिल्पे कोरली होती व त्यांच्या डोक्याच्या वरच्या भागावर त्यांची नावे कोरली होती. नावे अद्यापही दिसतात. परंतु दुर्दैवाने सर्व मूर्ती कालाच्या ओघात तुटल्या आहेत. त्यातील काहींच्या पायांचे थोडेसे अवशेष दिसतात. त्यांचा क्रम डावीकडून उजवीकडे आहे तो असा :

**क्रमांक १—राजा सिमुक सातवाहनो सिरीमातो**
राजा सिमुख (श्रीमुख) सातवाहन याचा (पुतळा)

**क्रमांक २—देवि–नायनिकाय रञो च सिरि-सातकनिनो**
राणी देवी नायनिका (नागनिका) आणि श्री सातकर्णी यांचे (पुतळे)

**क्रमांक ३—कुमारो भा. . . . . . य. . . . . .**
कुमार (राजपुत्र) भा.....य (हे नाव असलेला)

**क्रमांक ४—महारठि गणकयिरो. महारथी गणकयिर**
हा देवी नायनिकेचा पिता असावा.

**क्रमांक ५—कुमारो हकुसिरि**
कुमार हकुश्री (राजपुत्र शक्तिश्री)

**क्रमांक ६—कुमारो सातवाहनो**
कुमार सातवाहन (राजपुत्र)

**डाव्या भिंतीवरील शिलालेख नाणेघाट येथील नागनिकेचा लेख**

(१) सिधं.....मो धंमस नमो ईदस नमो संकंसनवासुदेवानं चंदसूयानं महिमावतानं चतुनं च लोकपालानं यम-वरुण-कुबेर-वासवानं नमो कुमारवरस. खदसिरिस रञो.

(२) .....वीरस सूरस अप्रतिहतचकस दखनापथपतिनो.

(३) मा.....बालाय महारठिनो अंगियकुलवधनस सागरगिरिवरवलयाय पथविय पथमवीरस वस.....य व अलह.....सलुस महतोमह.....

(४) सिरिस.....भारिया देवस पुतदस वरदस कामदस धनदस खदसिरि मानु सतिनो सिरिगतस च मातुय सीम.......

(५) वरिस.....नागवरदयिनिय मासोपवासिनिय गहतापसाय चरित ब्रह्मचरियाय दिखव्रतयञसुंडाय यञा हुता धूपनसुगंधाय निय....

(६) रायस.....यञेहि यिठं वनोवूअगाधेययंञो दखिना दिना गावो बारस १०+२ असो च १ अनारभनियो यंञो दखिना धेनु.....

(७) .....दखिनायो दिना गावो १०००+७०० हथी १०......

(८) .....स.....सतरयस वासलठि २००+८०+९ कुभियो रुपामयियो १०+७ भि

(९) ....रिको यंञो दखिनायो दिना गावो १००००+१००० असा १००० पसपको.....

(१०) .....१०+२ गमवरो १ दखिना काहापना २००००+४००० +४०० पसपको काहापना ६०००+१ राजसूयो यंञो.....सकटं

**उजव्या भिंतीवर :**

(११) धंञगिरि-तंसपयुतं सपटो १ असो १ असरथो १ गावीनं १००+१ असमेधो यंञो वितियो यिठो दखिनायो दिना असो रूपालंकारो १ सुवंनं....नि १०+२ दखिना दिना काहापना १००००+४००० गामो १....दखिना दिना

(१२) गावो सकटं धंञागिरितंस पयुतं....वायो यंञो....१०+७ धेनु वाय....सतरस

(१३) ....१०+७ अच....न .... लय .... पसपको दिनो .... दखिना दिना सु .... पिनि १०+२ आसो रुपालंकारो १ दखिना काहापना १०००....२

(१४) गावो २०००० भगलदसरतो यंञो यिठो दखिना गावो १०००० गर्गतिरतो यंञो यिठो....पसपको पटा ३०० गवामयनं यंञो यिठो दखिना दिना गावो १०००+१०० गावो १०००+१०० पसपको काहापना.... पटा १०० अतुयामो यंञो....

(१५) ....गवामयनं यंञो दखिना दिना गावो १००००+१०००.... अंगिरस(सा)मयनं यंञो यिठो दखिना गावो १०००+१०० त दखिना दिना....गावो १०००+१०० अंगिरसतिरतो यंञो यिठो दखिना गावो....

(१६) ....गावो १०००+२ छंदोपवमानतिरतो दखिना गावो १००० अंगिरसतिरतो यंञो यिठो दखिना....यंञो यिठो दखिना दिना गावो १०००

(१७) ....न सयं दखिना दिना गावो....त....अंगिरसामयनं छवस दखिना दिना गावो १००० दखिना दिना गावो १००० तेरस....अ

(१८) ....तेरसरतो स छ....अग दखिना दिना गावो....दसरतो म.....दिना गावो १०००० उ....१००००

(१९) ....यंञो दखिना दिना

(२०) .....दखिना दिना

## शिलालेखाचा आशय

डाव्या अन् उजव्या भिंतीवरील प्रचंड शिलालेखात देवी नागनिका हिने केलेल्या अनेक यज्ञांचे व त्यानिमित्त मुक्तहस्ताने दिलेल्या दानांचे उल्लेख आहेत. सुरुवातीस या लेखात लोकपाल, प्रजापती, धर्म, इंद्र, वरुण, कुबेर या वैदिक, आणि भागवत सांप्रदायातील वासुदेव, संकर्षण या दैवतांना वंदन केले आहे. वरील वैदिक व यदुवंशीय (वासुदेव, संकर्षण) दैवते यांचा समन्वय लक्षणीय आहे.

नागनिकेने केलेली पुण्यकृत्ये गौरवाने वर्णन केली आहेत. त्यात यज्ञ आहेत. दक्षिणापथपती सातकर्णीची सहधर्मचारिणी या नात्याने आणि त्याच्या मृत्यूनंतर स्वत: तिने केलेल्या अनेक श्रौत यागांचे वर्णन लेखात आहे. या यज्ञात दोन अश्वमेध व एक राजसूय, शिवाय अग्न्याध्येय, अन्वारंभणीय, गवामयन, भगाल-दशरात्र, आप्तोर्याम, अंगिरसामयन, गर्गत्रिरात्र, अंगिरसातिरात्र, छंदोगपवमान, त्रिरात्र, शतातिरात्र, त्रयदेशराम, दशरात्र इत्यादी श्रौत याग असून अनेक

यज्ञांची नावे नष्ट झाली असतील. या यज्ञांच्या वेळी ब्राह्मणांना गायी, हत्ती, घोडे, रथ, कार्षापण, सोन्याचांदीचे अलंकार दान दिल्याचा उल्लेख आहे. यात एक हजारापासून वीस हजारापर्यंत कार्षापण, शंभरापासून दहा हजारापर्यंत गायी, शेकडो घोडे, अनेक हत्ती, गावे, वस्त्रे इत्यादी आहेत.

यातील राजसूय आणि अश्वमेध हे यज्ञ राजकीय दृष्टीने फार महत्त्वाचे आहेत. दोन अश्वमेधांचे उल्लेख आहेत. त्याकाळी वर्षास दहा ते वीस लक्ष कार्षापण करसंभार उठवणाऱ्या राजानेच राजसूय यज्ञ करावा, तसेच पन्नास लाख ते एक कोटी कार्षापण उत्पन्न असलेल्या राजानेच अश्वमेध करावा असा संकेत असे. पहिल्यात आपण अभिषिक्त राजे आहोत व प्रजेची आपणास मान्यता आहे; तर दुसऱ्यात आपण बलाढ्य शत्रूवरील विजयाचे स्वामी आहोत हे दाखविले जाई. यावरून आपणास वरील शिलालेखांत राजकीय, धार्मिक, आर्थिक आणि सामाजिक बाबींचे सखोल दर्शन होते.

वरील लेख, नष्ट झालेल्या सातवाहन राजपुरुष आणि स्त्रियांच्या प्रतिमा, आणि त्यावरील नावे यावरून हे लेणे त्यांचे देवकुल असावे असे वाटते.

लेणीच्या बाहेर उजव्या बाजूस सात-आठ कुंडे आहेत व याच्याविरुद्ध दिशेच्या कपारीत अपूर्ण लेणे व कुंड आहे. संपूर्ण उतरत्या नागमोडी घाटाचे अंतर दोन-तीन किलोमीटर आहे. वाटेत अनेक पाण्याची कुंडे असून काहीवर शिलालेख आहेत. खाली शिंगरू नावाचे पठार आहे. तेथेही एक शिलालेख एका कुंडावर आहे. येथून दोन वाटा फुटतात. एक डावीकडे पोळू अन् सोनाळे या व उजवीकडचा वैशाखरे, टेकावडे, प्रधानवाडा वगैरे गावांकडे जातो. हाच रस्ता पुढे मुरबाडमार्गे नालासोपारा या प्राचीन बंदराकडे व मुंबईकडे जातो आणि शिंगरू पठारावरून मागे वळून पाहिले असता नाणेघाटाचे अत्युच्च शिखर दिसू लागते.

## *REFERENCES*

(1) JAMES FERGUSSON AND JAMES BURGESS: *The Cave Temples of India* (London, 1880).

(2) JAMES BURGESS: Report on the Buddhist Cave Temples and Their Inscriptions: *Archaeological Survey of Western India, Vol. IV* (London, 1883).

(3) JAMES BURGESS AND BHAGAWANLAL INDRAJI: *Inscriptions from the Cave Temples of Western India* (Varanasi, 1970, reprint).

(4) *Maharashtra State Gazetteers, History, Part I: Ancient Period* (Bombay, 1967).

(5) *Maharashtra State Gazetteers, History, Part II: Mediaeval Period* (Bombay, 1972).

(6) *Maharashtra State Gazetteers, History, Part III: Maratha Period* (Bombay, 1967).

(7) SURESH V. JADHAO: *Rock-cut Cave Temples at Junnar—An Integrated Study*, Ph.D. Thesis submitted to the University of Poona, 1980.

(8) SURESH V. JADHAO: " A New Coin Type of Vasisthiputra/Mahaksatrapa from Junnar." *Madhu*, Recent researches in Indian Archaeology and Art History, Ed. M. S. Nagaraja Rao, Delhi, 1981.



शिवनेरी किल्ल्यावरील उत्तरेकडील कडेलोटाची बाजू

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई